रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

वर्ष : १ अंक : ६

# साद

जून २०१८



## मुलांचा भार आजी-आजोबांवर नको

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

अध्यक्षा



**विजया रहाटकर**

सदस्य



**नीता राजेंद्र ठाकरे**

सदस्य



**गयाताई शिवाजीराव कराड**

सदस्य



**देवयानी ठाकरे**

सदस्य



**विंदा कीर्तीकर**

सदस्य



**ॲड. आशा लांडगे**

पदसिद्ध सदस्य



**सतीश माथूर**
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव



**डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे**

# संपादकीय

## मदतनीस 'सुहिता'



अंबरनाथची फरीदा आणि अब्दुल अजीज यांचे कुटुंब आर्थिक अडचणीत सापडले होते. या अडचणींमुळेच परदेशी जावे आणि काही पैसा गाठीशी बांधावा, असा विचार कुटुंबाने केला. म्हटले तर यात काहीच वावगे नाही, पण जगरहाटी इतकी सरळ नसते. फरीदाच्या अडचणीचा गैरफायदा घेणारे काही लांडगे समाजात वावरत असतात. इम्रान असाच एक लांडगा. फरीदाच्या अज्ञानाचा, तिच्या असहायतेचा गैरफायदा घेत त्याने तिला ओमानमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले. फरीदाही तिकडे जाण्यास तयार झाली. प्रत्यक्षात तिथे गेल्यावर फरीदाचे हाल सुरू झाले, मारहाण, शोषण, पिळवणूक यांना अंत नव्हता. तिचा पासपोर्ट काढून घेतला गेला. कुटुंबाशी संपर्क तोडण्यात आला. अखेर फरीदाचे पती अब्दुल अजीज खान यांनी राज्य महिला आयोगाच्या सुहिता हेल्पलाइनवर संपर्क साधला आणि आम्ही परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांच्या माध्यमातून फरीदाला भारतात आणण्यात यश मिळवले. इथे व्यक्ती महत्त्वाची नाही, याच जागी कदाचित कोणी फ्रेनी असू शकली असती किंवा एखादी फाल्गुनीही असू शकली असती. मानवी तस्करी ही देशातील महिलांविषयक प्रमुख गुन्ह्यांपैकी एक आहे. महिलांना गरजू महिलांना नोकरीच्या आमिषाने परदेशांत पाठवायचे आणि नंतर त्यांना वाममार्गाला लावायचे उद्योग ही मंडळी करतात. देशांतर्गतही ही तस्करी चालते. आदिवीस किंवा ग्रामीण भागांतून गरजू महिलांना मोठ्या शहरांत आणले जाते. नंतर त्यांची विक्री केली जाते. आयोगाने सुरू केलेली सुहिता हेल्पलाइन महिलांसाठी उपयुक्त ठरते आहे, याचा आम्हाला साभिमान आनंद वाटतो आहे. महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांना मदत मागण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे आणि ही बाब अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचा आयोगाचा प्रयत्न आहे आणि यापुढेही राहील. फरीदासारख्याच आज अनेक स्त्रिया मानवी तस्करीच्या शिकार ठरत आहेत. त्यांच्या कुटुंबीयांनी आयोगाकडे तक्रार नोंदविल्यास आयोग त्यांच्या मदतीला धावून जाईल, याची ग्वाही मी देते. कौटुंबिक छळ, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ अशा अनेक समस्यांनी महिला ग्रस्त आहेत. अनेकदा लाजेस्तव किंवा बदनामीच्या भीतीने महिला या विषयी उघड चर्चा टाळतात. त्यामुळे गुन्हेगार मोकाट सुटतात. मात्र, सुहिता हेल्पलाइन अशा महिलांसाठीही उपयुक्त ठरेल. तक्रारदार महिलेची ओळख गोपनीय ठेवून दोषींवर कारवाई करता येणे शक्य आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी, सक्षमतेसाठी सवर्तोपरी प्रयत्न करण्यास आयोग बांधील आहे. राज्यातील अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न आम्ही विविध माध्यमांतून करीत आहोतच. महिलांनीही आमच्या या प्रयत्नांना साथ द्यावी, अशी माझी त्यांना विनंती आहे. जेणेकरून, समाजात वावरणाऱ्या इम्रानसारख्या लांडग्यांचा बुरखा फाडता येईल आणि त्यांना कठोर शिक्षा करता येईल.

**विजया रहाटकर**, मुख्य संपादक आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा


शौर्य महोत्सवी वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# साद

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
फोन : ०२२-२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परळ, मुंबई-१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

**आयोगाशी संपर्क :**
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**'सुहिता' हेल्पलाइन ७४७७७२२४२४**

**स्वागत मूल्य :** ₹ १०
**वार्षिक स्वागत मूल्य :** ₹ १००



शौर्य महोत्सवी वर्ष २०१८ // स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**वाचकांना निवेदन** 'साद' हे महिला आयोगाचे मुखपत्र असले तरी, येथे प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक लेखांशी आयोग सहमतच असेल, असे नाही.

# अंतरंग...


समाजमाध्यमांतील भस्मासुरांपासून
## महिलांना वाचवू...

मुलींची-महिलांची समाजमाध्यमांद्वारे (सोशल मीडिया) होणारी बदनामी, छळणूक रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगानं 'सायबर-समिती'ची स्थापना नुकतीच केली आहे. मुलींना-महिलांना लक्ष्य केल्या जाणाऱ्या प्रकरणांचा अभ्यास करून अशा प्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठीच्या शिफारशी ही समिती करेल. या समितीच्या एकंदर स्वरूपाविषयी...

पान ९



## तारिणी परतली

पान २१

## एका जिद्दीचा प्रवास...



पान २६

## 'सखी-रुपे'री...

गेल्या काही वर्षांत महिलाप्रधान चित्रपटांची संख्या हिंदी चित्रपटसृष्टीत वाढते आहे. महिलांच्या प्रश्नांकडे, समस्यांकडे संवेदनशीलतेनं पाहणारी एक नवी फळी चित्रपटसृष्टीत तयार झाली आहे.

पान ३०

## लोकशाही तळातली

वित्त, कार्ये आणि कार्यकर्ते (फायनान्स, फंक्शन्स व फंक्शनरीज) ही तिन्ही ग्रापंचायतींची अंग महत्त्वाची असून, प्रत्येकाचा सुटा सुटा विचार करून चालणार नाही. तळातली लोकशाही व्यवस्था गतिमान करण्यासाठी या तिन्ही घटकांचा एकत्र विचार करण्याची गरज आहे.

पान ३४


// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# आनंदमयी अंगणवाडी...



**राज्य महिला आयोगाच्या वतीने राज्यातील कारागृहांची तपासणी करण्यात येत आहे. त्या अंतर्गत आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी पुण्यातील येरवडा कारागृहाला भेट दिली. कैदी महिलांच्या मुलांसाठी चालविण्यात येणाऱ्या अंगणवाडीविषयी...**

दिवसभराच्या धावपळीमध्ये एखादा क्षण असा वाट्याला येतो, की थकवा नुसता पळून जात नाही; तर एकदम सकारात्मकतेची ताजी झुळूक मनाला स्पर्शून जाते...

सरत्या शनिवारी तसेच काही तरी झाले. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने राज्यातील तुरुंगांना भेटी देऊन तेथील महिला कैद्यांची पाहणी करण्याचा उपक्रम हाती घेतलाय. त्यानिमित्ताने मी पुण्यातील येरवडा कारागृहाला भेट दिली. एक अर्थाने ती शासकीय पाहणीच. पण मी शक्यतो तसा 'फील' येऊ नये, यासाठी नेहमीच प्रयत्न करते. त्यामुळे येरवडा तुरुंगातील महिलांच्या बराकी,




// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //



स्वच्छतागृहे, स्वयंपाकघर, त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी असलेल्या सुविधा, त्यांना शिकविली जात असलेली कौशल्ये या सर्वांची पाहणी केली. तुरुंग प्रशासनाच्या अडचणी विचारल्या. कैद्यांची दाटीवाटी ही मुख्य अडचण. १२६ जणींची क्षमता असताना जवळपास २८९ कैदी तिथे कोंबलेत. याशिवाय पोलिस आणि हॉस्पिटल गार्डची कमतरता ही एक आणखी मोठी अडचण. आता टेलिकॉन्फरन्स व टेलिमेडिसीन सुविधेमुळे कैद्यांना अनुक्रमे न्यायालयात आणि हॉस्पिटलमध्ये नेण्याच्या संख्येत अगदी पन्नास टक्क्यांहून अधिक घट झालीय. तरीसुद्धा पोलिसांकडून पुरेशा प्रमाणात गार्डस उपलब्ध होत नसल्याने महिला कैद्यांची खूपच हेळसांड होते असल्याचे तुरुंग प्रशासनाचे म्हणणे होते. प्राथमिकदृष्ट्या तरी मला त्यात तथ्य आढळले.

आणखी एक बाब लक्षात आली, ती म्हणजे जामीन मिळूनही जामिनाची रक्कम भरू शकत नसल्याने काही महिला कैद्यांची सुटका होऊ शकलेली नाही. अशी संख्या अगदी हाताच्या बोटावर. टाटा ट्रस्टसारख्या काही स्वयंसेवी संस्था अशा कैद्यांची जामीन रक्कम भरतातही. पण ती पाच-दहा हजार रूपयांपर्यंत असली तर. काही कैद्यांची जामीन रक्कम पन्नास हजार ते दोन लाख रूपयांपर्यंत असते. तिथे मग स्वयंसेवी संस्था हात टेकतात आणि ते कैदी तिथेच अडकून पडतात. मला असे वाटले, की या अशा कैद्यांसाठी स्वतंत्र निधी (डेडिकेटेड फंड) उभा केला पाहिजे. फार तर एक-दीड कोटी रूपये लागतील. असा निधी महिला आयोगही उभा करू शकतो. लक्षात घेण्यासारखी एक गोष्ट म्हणजे, की जामिनाची रक्कम परत मिळत असते. एका अर्थाने हा निधी रिकरिंग डिपॉजिट्स (आरडी) सारखा असेल. तुरुंग प्रशासनाने तसा प्रस्ताव दिला तर आयोग पावले उचलू शकेल.

कैद्यांसाठी खूप उपक्रम राबविले जात असल्याचे मला जाणवले. कायदेशीर जनजागृतीपासून ते अधिक मनोधैर्य कायम राखण्यासाठी ज्ञानेश्वरी पारायणापर्यंत अनेक उपक्रम स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने घेतले जात असल्याचे समजले. काही कैदी तर चक्क पदवी परीक्षा देत होते. मी गेले तेव्हा तिथे नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठाच्या केंद्रावर परीक्षा चालू होती. कैदी व नातेवाईकांच्या भेटीसाठी केलेली व्यवस्थाही खूप चांगली वाटली. नंतर मी खुल्या कारागृहाला भेट दिली. ही चांगली संकल्पना आहे. उत्तम वर्तूणक असलेल्या कैद्यांना मोकळ्या वातावरणात वावरण्याची संधी दिली जाते. तुरुंगांना अधिक मानवी रूप देण्याचा हा प्रयत्न खरोखरच चांगला वाटला.

...पण मन प्रसन्न झाले ते कारागृहाच्या परिसरातील अंगणवाडीने. महिला कैद्यांच्या सहा वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी असलेली ही अंगणवाडी. नातेवाईक नसल्याने किंवा नातेवाईक पुढे येत नसल्याने महिला कैद्यांबरोबर त्यांच्या मुलांनाही तुरुंगात राहावे लागते. त्यांचा काहीही दोष नसताना त्यांचे मुक्त अवकाश कळत-नकळत हिरावले जाते. पण त्यास पर्याय नसतो. अशास्थितीत येरवडा कारागृहाने चालविलेली छोटेखानी अंगणवाडी पाहिली आणि ती अभागी चिमुरडी पाहून मला एकदमच गलबलून आले. त्यांना प्रेमाने जवळ घेतले, मायेने कुरवाळले. पाच-सहा जण होती ती. एकदम स्मार्ट. चुणचुणीत. कुणी 'ट्विंकल ट्विंकल लिटल स्टार' म्हणून दाखवत होतं, तर कुणी अस्सल मराठीतील बालगीते. त्यांचा वर्गही छान सजविलेला. त्यांचे शिक्षक दुसरे तिसरे कुणी नसून सामाजिक कार्यकर्तेच. बरं ही सगळी मुले तुरुंग अधिकारयांचीही जणू काही लाडकी असावीत. त्यांच्यात कदाचित एक मैत्रच जन्माला आले असावे. असे वाटण्याचे कारण म्हणजे त्यांची एकमेकांतील देहबोली.

खरं सांगायच तर ती मला आनंदमयी अंगणवाडी वाटली. नाही तर तुरुंगातले वातावरण तसे एकदम नकारात्मकच. पण त्याच्या सावलीत फुलणारी ही सकारात्मकता मनात भरून राहिली. आभाळ फाटले म्हणून काय झाले; एक-दोन टाके घालायला काय हरकत... अगोदरच म्हटल्याप्रमाणे ही शासकीय पाहणी. त्यातच महिला आयोगाला अर्धन्यायिक अधिकार असतात. त्यामुळे तुरुंगातील त्रुटी (असल्याच तर), काही शिफारशी यांच्यावर आधारित पाहणीचा अहवाल वगैरे प्रक्रिया होईलच. राज्यातल्या सर्व तुरुंगांचा लेखाजोखा मांडला जाईल आणि तो राज्य सरकारला उचित कार्यवाहीसाठी यथावकाश पाठविलाही जाईल. पण ती अंगणवाडी आणि त्यातील चिमुरडी पाहून स्वतःला व्यक्त करावेसे वाटले. म्हणून हा अनौपचारिक लेखनप्रपंच...

# महिला कैद्यांना थेट आयोगाशी संपर्क साधणे शक्य

साद प्रतिनिधी

राज्यातल्या कारागृहात असलेल्या महिला कैद्यांना काही तक्रारी असल्यास या महिला कैदी आता थेट महिला आयोगाला कळवू शकतील. महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी राज्यातल्या महिला कारागृहांची पाहणी केली. या पाहणीनंतर महिला कैद्यांना त्यांच्या तक्रारी थेट महिला आयोगाला करण्याची व्यवस्था आता सर्व कारागृहात उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

विजया रहाटकर यांनी आज पुण्यातल्या येरवडा कारागृहाला भेट दिली. या ठिकाणच्या महिला कैद्याच्या कारागृहांची पाहणी केली. त्यानंतर त्या बोलत होत्या. राज्यात ३१ महिला कारागृह आहेत आणि इथल्या महिला कैद्यांच्या काही समस्या असू शकतात. मात्र त्या मांडण्याची जागा त्यांना मिळत नसते. मुंबईत मंजुळा शेट्टी या महिला कैदीच्या आत्महत्येनंतर ही बाब प्रकर्षाने समोर आली होती. त्यानंतर राज्य महिला आयोगाने कैदी महिलांच्या सुरक्षेबाबत काही उपाययोजना करण्यासाठी सरकारला शिफारस केल्या होत्या. ज्यात प्रत्येक महिला कारागृहात काही तक्रारी असल्यास महिला आयोगाचा संपर्क असलेला फलक लावण्याबाबत सूचित करण्यात आले होते. त्यानुसार आता महिला कैद्यांना आता थेट महिला आयोगाशी संपर्क करता येईल, असे रहाटकर यांनी स्पष्ट केले.

कैद्यांना मिळणाऱ्या सुविधा, जेवण, राहण्याचे ठिकाण, झोपण्याची व्यवस्था, आरोग्याचे प्रश्न, मुलांची अंगणवाडी याबाबतची पाहणी यावेळी रहाटकर यांनी केली. क्षमतेपेक्षा जास्त महिला कैद्यांना एकाच ठिकाणी ठेवल्याने क्षमतेवर येणारा ताण सोबतच त्यांच्या सुविधा पुरवण्यावर येणारी मर्यादा यावर आयोगाने प्रशासनाला प्रस्ताव दिला आहे. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून महिला कारागृहात सीसीटीव्ही बसवले जावेत, अशी सूचना कारागृह प्रशासनाला करण्यात आली आहे. तसेच महिला कारागृहात लवकरच सॅनिटेरी व्हेंडरिंग मशीन बसविण्यात येणार आहेत. अनेक ठिकाणी महिला कैद्यांना पैशाअभावी जामिनाची अडचण येते, अशा महिला कैद्यांच्या जामिनाकरता एकत्रित फंड उभारणीबाबत ही विजया रहाटकर यांनी माहिती दिली.

**(सौजन्य : इनाडू इंडिया)**






# येरवड्यातील कैदी बनवणार सुटे भाग

साद प्रतिनिधी

पुण्यातील येरवडा कारागृहातील महिला कैद्यांना दुचाकी वाहनांचे सुटे भाग बनविण्याचे प्रशिक्षण देण्याची योजना आहे. हे भाग वापरून बनविलेल्या दुचाकी लवकरच बाजारात दिसू लागतील.

सध्या या कारागृहातील महिलांना गाड्याचे इग्निशन स्विच आणि इंधन टाकीवरील झाकणे बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जेणेकरून, त्या कारागृहातून मुक्त झाल्यानंतरही रोजगारक्षम होतील.

मिंदा कॉर्पोरेशन या खासगी कंपनीच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे, अशी माहिती येरवडा कारागृहाचे वरिष्ठ तुरुंगाधिकारी नितीन क्षीरसागर यांनी दिली. सध्या कारागृहातील पुरुष कैदी बोलेरो गाड्यांसाठी लागणाऱ्या वायरिंग हार्नेस बनवतात. महिंद्र अँड महिंद्र आणि मिंदा साई या कंपन्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे, असेही क्षीरसागर यांनी सांगितले.

हा उपक्रम आमच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीचा (सीएसआर) भाग आहे, असे मिंदाच्या मनुष्यबळ विकास विभागाचे उपव्यवस्थापक अमोल पगारे यांनी सांगितले. तूर्त आम्ही येरवडा कारागृहातील १५ महिला कैद्यांना प्रशिक्षण देणार आहोत. भविष्यात या उपक्रमात ५० महिलांना सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

बजाज, टीव्हीएस, महिंद्र अँड महिंद्र आणि रॉयल एन्फील्ड हे आमचे ग्राहक असतील. हे काम प्रामुख्याने मागणीनुसार पुरवठा या तत्त्वावर करण्यात येणार आहे, पण कारागृहातील महिलांची उत्पादकता दरदिवशी २००० युनिटपर्यंत वाढविण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. प्रत्येक कैद्यामागे कारागृहाला २५० रुपये देण्यात येतील. तसेच, उत्पादन प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी कंपनीतील एक कमर्चारी कारागृहात नियुक्त केला जाईल. बाहेर याच कामासाठी आम्हाला दिवसाला ३५० रुपये मोजावे लागतात. इथे आम्हाला कच्चा माल व तयार उत्पादनाचा वाहतूक खर्च वाढणार आहे, अशी माहितीही पगारे यांनी दिली.

**१२६**
**कारागृहाची महिला कैदी सामावून घेण्याची क्षमता**

**२७१**
**येरवडा कारागृहातील महिला कैद्यांची संख्या**

### ऐतिहासिक वारसा

येरवडा कारागृहाला ऐतिहासिक वारसा आहे. हे कारागृह राज्यातील सर्वांत मोठ्या कारागृहांपैकी एक असून, त्याचा विस्तार ५०० एकर परिसरात आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, सरोजिनी नायडू आदी नेत्यांना याच कारागृहात ठेवण्यात आले होते. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील ऐतिहासिक पुणे करारावर याच ठिकाणी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

**(सौजन्य : डीनए)**

# समाजमाध्यमांतील भस्मासुरांपासून

# महिलांना वाचवू...



**मुलींची–महिलांची समाजमाध्यमांद्वारे (सोशल मीडिया) होणारी बदनामी, छळणूक रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगानं 'सायबर–समिती'ची स्थापना नुकतीच केली आहे. याबाबत दै. 'सकाळ'च्या सप्तरंग पुरवणीत प्रकाशित झालेले आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांची ज्येष्ठ पत्रकार मृणालिनी नानिवडेकर यांनी घेतलेली मुलाखत...**

आधुनिक काळात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत, प्रगतीच्या संधी शोधत आहेत अन् त्याच वेळी या नव्या प्रांतात मुशाफिरी करताना पुरुषप्रधान मानसिकतेच्या बळीही ठरत आहेत. अधिकारपदावर असलेल्या किंवा कायदेमंडळात सक्रिय असलेल्या महिलेलाही आज सायबर-टीकेला सामोरं जावं लागत आहे. ही टीका सहन होणं शक्य नाही', अशा प्रकारातली आहे. ती व्हायरल स्वरूपाची असल्यानं थेट सोशल डोमेनमध्ये पसरत आहे. विकृत मानसिकतेतून उद्भवणाऱ्या या प्रकाराला सामोरं जाणं महिलांना कठीण ठरत आहे. समाजमाध्यमांतून (सोशल मीडिया) महिलांविरुद्ध केल्या जाणाऱ्या अवमानजनक, मानहानिकारक




आणि कित्येकदा अश्लील प्रकारात मोडणाऱ्या शेरेबाजीचे प्रकार वाढत आहेत, त्यांची तीव्रताही टोकाची आहे. या प्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगानं सायबर-समिती स्थापन केली आहे. महिलांवरची सायबर-टीका रोखण्यासाठी कोणते कायदे करायला हवेत यासंबंधातल्या शिफारशी ही समिती राज्य सरकारला करेल. महिलांना सायबर-संरक्षण देण्यासाठी कायदे करायला हवेत, ते कशा प्रकारचे हवेत, याबद्दल विचार करणारं महाराष्ट्र हे पहिलंच राज्य ठरणार आहे. या उपक्रमाबद्दल, समिती करणार असलेल्या शिफारशींबद्दल राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांच्याशी साधलेला हा संवाद...

**प्रश्न : प्रचलित व्यवस्थेत अत्यावश्यक असलेली सायबर-संरक्षणव्यवस्था प्रत्यक्षात आणण्याची गरज वाटली याबद्दल आपलं अभिनंदन! पण हे नेमकं सुचलं तरी कसं?**

**विजयाताई :** राजकारणात सक्रिय असलेल्या महिलांबद्दल अश्लील मजकूर पसरवल्याबद्दल काही महिन्यांपूर्वी किंवा कदाचित वर्षभरापूर्वी असेल, पोलिस खात्यात तक्रार नोंदवली गेली होती. मजकूर अत्यंत अवमानकारक होता. तपशील सांगणंही कठीण आहे; पण प्रकरण गंभीर होतं. केवळ एकाच पक्षातल्या महिलानेत्याविषयी नव्हे, तर सगळ्याच राजकीय पक्षांतल्या महिलानेत्यांच्या नावेही थोड्याबहुत फरकानं असंच गरळ ओकलं जात असल्याचं वास्तव मग लक्षात आलं. फार भयावह होता हा प्रकार. महिला आयोगाची सूत्रं हाती घेतल्यानंतर एक दिवस काही - महिला-पत्रकार गप्पा मारायला म्हणून आल्या अन् त्यांनीही असेच अनुभव आपल्या वाट्याला येत असल्याचं सांगितलं. कामाच्या ठिकाणी दोन पुरुषांचं परस्परांशी पटत नसेल तर ते आपापसात बोलून सांगितलं जातं. मतभेद तीव्र असतील तरी त्याबद्दल चर्चा होते. मात्र, - महिला-सहकाऱ्यांशी पटत नसेल तर ते वाद सोडवण्यासाठी चर्चा करण्याची तयारी तर नसतेच; उलटपक्षी ते वाद वाढवत आडमार्गाचा अवलंब करत त्या महिलेलाच लक्ष्य केलं जातं, असं त्या चर्चेतून निष्पन्न झालं. सध्या सायबर-वापर वाढलेला असल्यानं समाजमाध्यमांवर त्या महिलेविषयी काही लिहिणं, विकृत चित्रफिती तयार करून त्या अपलोड करणं असे प्रकार सर्रास घडवले जातात, असंही लक्षात आलं. खरं तर मी हादरलेच...प्रारंभीचे काही दिवस हे वास्तव स्वीकारण्यात गेल्यावर मग लक्षात आलं, की यावर नियंत्रण आणण्यासाठी काहीतरी केलंच पाहिजे. महिलांचे प्रश्न सोडवणाऱ्या उपाययोजना राज्य सरकारला सुचवण्याचे अधिकार आयोगाला

आहेत. त्यांचा योग्य तो उपयोग महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी करण्याचे प्रयत्न सुरू होतेच. सायबर-गुन्ह्यांना प्राधान्य देण्याचं ठरलं. समाजमाध्यमांत महिलांवर काय अन्याय होत आहेत, हे समजून घेत अशा प्रकारांना प्रतिबंध आणणारे कायदे सुचवण्यासाठी तज्ज्ञ समिती नेमली. काय करायला हवं, याबद्दल आता तीन महिन्यांत ही समिता सरकारला अहवाल देईल.

याशिवाय सायबर-डेस्कही सुरू करण्यात येणार असून, मुलींच्या-महिलांच्या बदनामीची आगळीक समाजमाध्यमांतल्या ज्या कुठल्या कंपनीच्या ई-प्लॅटफॉर्मवर झालेली असेल, त्या कंपनीच्या भारतातल्या प्रमुखांना बोलावून घेऊन त्याबाबत त्यांच्याकडं विचारणा केली जाईल.

**प्रश्न : समाजमाध्यमांद्वारे महिलांना सध्या नेमका कोणता त्रास सहन करावा लागत आहे, याबद्दल काही सांगू शकाल का?**

**विजयाताई :** नोकरीत अधिकारपदावर काम करणाऱ्या महिलांवर समाजमाध्यमांतून शेरेबाजी केली जात आहेच; शिवाय घरगुती सुरक्षित कौटुंबिक आयुष्य जगणाऱ्या महिलांबाबतही हे घडत आहे. कामाच्या ठिकाणी बॉस असणाऱ्या महिलेचा एखादा निर्णय आवडला नाही किंवा रुचला नाही तर तिचं चारित्र्यहनन करणारी काही दृश्यं टाकायची, तिचं कुणाशी तरी नाव जोडून मॉर्फिंग केलेले व्हिडिओ जोडायचे हा सर्रास घडणारा प्रकार. घटस्फोटांचं प्रमाणही आजकाल वाढलं आहे. संसार करणं शक्य नसल्यानं एक मुलगी निराश होऊन परतली, तर जोडीदारानंच तिचा मोबाईल-क्रमांक देत ही महिला शरीरविक्रय करण्यासाठी उपलब्ध आहे,' असं व्हायरल केलं. येणारे फोन आणि गिऱ्हाईक म्हणून होत असलेल्या मागण्या, मेहनतान्याबद्दलच्या ऑफर्स ऐकूनही कुणी सर्द होईल, अशी अवस्था होती. कित्येक महिला या प्रसंगांतून जात आहेत. शिवाय, असा अनवस्था प्रसंग घरच्यांना, कुटुंबीयांना सांगायचा तरी कसा, असा प्रश्न या तरुणींना, महिलांना भेडसावत आहेच. त्यामुळं मग शिफारस समितीनं साधारणत: समोर येणाऱ्या समस्या कोणत्या, त्यांचं स्वरूप काय यावर आधी चर्चा करून मग शिफारशींकडं वळण्याचं ठरवलं.

**प्रश्न : समस्या कोणत्या आल्यात समोर ?**

**विजयाताई :** गंभीर स्वरूपाच्या शेरेबाजीपासून ते अश्लील चित्रफिती तयार करून त्या व्हायरल करण्यापर्यंत कितीतरी...

गंमत वाटेल; पण ईमोजींचा खरा अर्थ काय, याबद्दल वापर करणाऱ्या तरुणीच अनभिज्ञ...मग त्यांतून सूचित होणारे अर्थ वेगळे. समोरचा त्यांचा श्लेष काढणार. सायबर-जग जसं नवं तसे ते वापरणारेही अत्युत्साही; त्यामुळं जाच फार वेगळ्या प्रकारचे आहेत. त्यांचं संहितीकरण (कोडिफिकेशन) करणं फार जिकिरीचं आहे.

**प्रश्न : आजवर झालेल्या बैठकीतले काही ठळक मुद्दे सांगाल काय?**

**विजयाताई :** सांगते ना. तज्ज्ञांनी सर्वप्रथम लक्षात आणून दिलं ते हे की माहिती तंत्रज्ञान कायदा इतक्यातच झाला असल्यानं




त्याला अद्याप ठाशीव स्वरूप येणं बाकी आहे. काही त्रुटी दूर कराव्या लागतील. पोलिसांनी कारवाई करायची ठरवली तरी ती कोणत्या कलमाखाली करता येईल, याबद्दल अद्याप बराच ग्रे एरिया' आहे. कलम ६६ (अ) हे महिलांवरच्या अत्याचारांबाबतच्या उपाययोजना सुचवतं; पण ते तोकडं पडत आहे. त्याची फेरआखणी करायला हवी. दुसरा किचकट असलेला; पण अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, सेवा पुरवणाऱ्या सर्व कंपन्या विदेशांत स्थित असल्यानं एखादा आक्षेपार्ह मजकूर काढायचा ठरलं तरी सर्व्हर विदेशांतल्या मुख्यालयात असल्यानं तो डिलिट करण्याची प्रक्रियाच महागुंतागुंतीची. मग समितीनं विचार मांडला तो त्या कंपन्यांच्या भारतातल्या प्रमुखांशी याबाबत चर्चा करण्याचा. एक-दोन बैठका झाल्या आहेत. किमान सहा ते आठ बैठका तरी होतील अजून उपाययोजना शोधण्यासाठी...समाजमाध्यमांच्या गैरवापरामुळं अनेक मुलींची-महिलांची आयुष्यं वादळात सापडलेली आहेत. अशा वादळांतून त्यांना वाचवणारे कायदे तयार करणं गरजेचं झालं आहे.

**प्रश्न : आयोग बजावू शकेल ही कामगिरी? जीवनाच्या नवनव्या क्षेत्रांत अस्तित्व शोधणाऱ्या महिला खरंच सायबर-विश्वातल्या अनुदारतेपासून स्वत:चा बचाव करू शकतील ?**

**विजयाताई :** शिफारशी करण्याचे अधिकार आयोगाकडं आहेत. त्यांचा योग्य वापर करत आम्ही वेगवेगळ्या प्रश्नांबद्दल शिफारशी करत आहोत. सायबर-विश्वातल्या तज्ज्ञांना बरोबर घेऊन समिती प्रश्नांचा अभ्यास करत आहे. सरकार या सगळ्या बाबींकडं गांभीर्यानं पाहत आहे; त्यामुळंच समितीच्या शिफारशी स्वीकारत आणि कायद्यात योग्य ते बदल करत महिलांना समाजमाध्यमांतल्या भस्मासुरांपासून वाचवलं जाईल.

# लैंगिक छळ पीडितांना दहा लाखांची मदत

## सर्वोच्च न्यायालयाचा केंद्र सरकारला आदेश

सामूहिक बलात्कार पीडितेला निर्भया निधीतून १० लाख रुपयांची मदत देण्याच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने १० मे रोजी केंद्र सरकारला दिला.

न्या. मदन लोकूर आणि दीपक गुप्ता यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. या योजनेनुसार बलात्कार पीडितेला चार ते लाख रुपये आणि सामूहिक बलात्काराला बळी पडलेल्यांना पाच ते १० लाख रुपयांपर्यंतची मदत देणे सरकारवर बंधनकारक आहे. या बाबतच्या योजनेचा आराखडा राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाने (नाल्सा) तयार केला आहे.

बलात्कार पीडितेचा मृत्यू झाला असल्यास तिच्या कुटुंबीयांना पाच ते १० लाख रुपयांपर्यंतची मदत देण्यात यावी. पीडितेबरोबर अनैसर्गिक कृत्य झाले असल्यास चार ते सात लाख रुपये मदत मिळावी. तसेच, बलात्कारातून पीडिता गर्भवती राहिल्यास तिला तीन ते चार लाख रुपयांची अतिरिक्त मदत देण्यात यावी, अशी ही योजना आहे.

एखाद्या गर्भवती महिलेचा बलात्कारामुळे गर्भपात झाल्यास तिला दोन ते तीन लाख रुपयांची मदत द्यावी. असिड हल्ला अथवा पेटवून दिल्यामुळे व्यंग आल्यास पीडितेला सात ते आठ लाख रुपये मदत देण्यात यावी. पीडितेला ५० टक्क्यांहून अधिक दुखापत झाल्यास पाच ते आठ लाख रुपये मदत द्यावी. वरील सर्व प्रकारांमध्ये पीडिता अल्पवयीन असल्यास तिला मूळ रकमेच्या दीडपट रक्कम देण्यात यावी, असेही योजनेच्या मसुद्यात नमूद आहे.

या योजनेंतर्गत बलात्कार वा लैंगिक हल्ल्याच्या कोणत्याही घटनेची स्वतःहून दखल घेण्याचे अधिकार विधी सेवा प्राधिकरणाला देण्यात आले आहेत.



### निर्भया निधीतील मदत

- बलात्कार पीडितेला ४ ते ७ लाख रुपये
- सामूहिक बलात्कार पीडितेला ५ ते १० लाख रुपये
- अनैसर्गिक कृत्य पीडितेला ४ ते ७ लाख रुपये
- असिड हल्ला अथवा पेटवून दिल्यामुळे व्यंग आल्यास ७ ते ८ लाख रुपये

**(सौजन्य : न्यू इंडियन एक्स्प्रेस)**



जिल्हा परिषद अधिकाऱ्यांच्या बैठकीवेळी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर. सोबत (डावीकडून) सदस्या गयाताई कराड, प्रभारी सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे, विजया रहाटकर, विंदा कीर्तिकर, आशा लांडगे.

# महिला समुपदेशन केंद्र सुरूच ठेवा

## आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांची जिल्हा परिषदांना सूचना

साद प्रतिनिधी

महिलांच्या न्याय हक्कासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यरत आहे. यामध्ये जिल्हा पातळीवरील महिला समुपदेशन केंद्र ही आयोगाचा कणा म्हणून काम करत आहेत. त्यामुळे जिल्हा पातळीवरील समुपदेशन केंद्र सुरू राहण्यासाठी जिल्हा परिषदांनी पुढाकार घेतला पाहिजे. त्यासाठी निधीची कमतरता पडू देऊ नका, अशी सूचना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केली.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्यावतीने राज्यातील विविध जिल्ह्यांतील उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला आणि बाल कल्याण विभाग), जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, जिल्हा समन्वयक यांची बैठक नुकतीच राज्य महिला आयोग कार्यालयात आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. जिल्हा स्तरावर असणारी समुपदेशन केंद्र, स्थानिक महिला तक्रार निवारण समिती, 'जेंडर बजेट'चा विनियोग, जिल्हा समन्वयकांच्या समस्या आदी विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली. सदर बैठकीस राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, सदस्या गयाताई कराड, विंदा कीर्तिकर, आशा लांडगे, प्रभारी सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे उपस्थित होते.

यावेळी बोलताना विजय रहाटकर म्हणाल्या की, महिलांना न्याय देण्यासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा स्तरावर असलेली समुपदेशन केंद्र महत्त्वपूर्ण योगदान देत असतात. महिलांना आपल्या जिल्ह्यात न्याय मिळावा या दृष्टीने ही केंद्र सुरू राहणे गरजेचे आहे. निधीची चणचण असल्यास आयोग त्याकरिता शासनाकडे पाठपुरावा करेल. मात्र 'सेस फंडा'तून निधी देत जिल्हा परिषदांनी केंद्र सुरू ठेवावीत. तसेच स्थानिक महिला तक्रार निवारण समितीने जलद कार्यवाही करून महिलांना न्याय मिळवून द्यावा.



सध्या राज्यात सुमारे तीनशे समुपदेशन केंद्र आहेत. ती प्रामुख्याने ग्रामीण भागात आहेत. त्यामार्फत अडचणीतील संकटग्रस्त महिलांना कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन दिले जाते. मात्र काही जिल्हा परिषदांनी निधीचे कारण पुढे करून समुपदेशन केंद्र बंद केल्याच्या तक्रारी आयोगाकडे आल्या आहेत. त्याची दखल घेत आयोगाने ही बैठक बोलावली होती.

# फरीदा खान यांना फसविणाऱ्या एजंटला अटक

## महिला आयोगाच्या प्रयत्नांमुळे मिळाला न्याय

साद प्रतिनिधी

घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने नोकरीसाठी ओमानला गेलेल्या फरीदा खान यांची फसवणूक करणाऱ्या आणि तिला चुकीच्या ठिकाणी नोकरीला लावणारा एजंट इम्रान याला अखेर अंबरनाथ पोलिसांनी अटक केली आहे. फरीदा यांच्या सुटकेसाठी इम्रानने घेतलेले तिचे ४० हजार रुपयेही तिला परत केले आहेत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या प्रयत्नाने आणि परराष्ट्र मंत्रालयाच्या मदतीने मस्कत, ओमान येथे अडकलेल्या फरीदा खान या महिलेची सुटका झाली आहे. या महिलेने ११ मे रोजी पती सह आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांची भेट घेऊन आभार मानले.



**मस्कतहून सुटका करण्यात आलेल्या फरीदा खान यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांची गेल्या महिन्यांत भेट घेतली.**


अंबरनाथ येथे राहणारया फरीदा खान नोकरीसाठी एजंटमार्फत दुबईला गेल्या मात्र त्यांनतर त्यांचा संपर्कच तुटल्याने त्यांचे पती अब्दुल अजीज खान यांनी महिला आयोगाच्या 'सुहिता' (७४७७७२२४२४) या हेल्पलाईनवर फोन करून आपली व्यथा सांगितली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अब्दुल अजीज खान यांना ०६/०४/२०१८ रोजी आयोग कार्यालयात बोलविण्यात आले. त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे फरीदा या घरातील अडचणीच्या आर्थिक परिस्थितीमुळे २७ जानेवारी २०१८ रोजी दुबई येथे नोकरीसाठी गेल्या मात्र त्यानंतर त्यांना मस्कत येथे पाठविण्यात आले आणि त्यांचा कुटुंबीयांशी संपर्क तुटला. त्यांना जिथे कामासाठी पाठविण्यात आले तिथे त्यांचा छळ होत होता. मात्र पासपोर्ट व इतर कागदपत्र जप्त केल्याने त्यांचे परतीचे मार्ग ही बंद झाले होते. पती अब्दुल अजीज खान यांनी आयोगाला दिलेल्या माहितीच्या आधारे आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांच्याशी याबाबत चर्चा करून मदत करण्याची विनंती केली. सुषमा स्वराज यांनी स्वतः ओमान येथील भारतीय दूतावासाला याबाबत लक्ष घालण्याचे आदेश दिले. दूतावासाने ओमान येथील एजंटकडे याबाबत चौकशी सुरु झाल्यानंतर फरीदा खान यांना परत पाठविण्याचा निर्णय झाला आणि १ मे च्या रात्री फरीदा खान याना मुंबईकडे रवाना करण्यात आले.

परत आल्यानंतर औषधचार घेत असलेल्या फरीदा खान यांनी आज विजया रहाटकर यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले. तसेच अनेक महिला नोकरीसाठी दुबई, मस्कत येथे जातात मात्र त्यांना गुलाम ासारखी वागणूक दिली जाते तेव्हा यातून आपल्या सारख्या इतर महिलांना सोडवावे अशी विनंती ही त्यांनी यावेळी केली.

### अशा घटना टाळण्याचा प्रयत्न – रहाटकर

याबाबत विजया रहाटकर म्हणाल्या की, 'सुहिता' (७४७७७२२४२४) या नव्यानेच आयोगाने सुरू केलेल्या हेल्पलाइनवर ही तक्रार आली होती. याचे गांभीर्य लक्षात घेऊन आयोगाने परराष्ट्र मंत्रालयाच्या मार्फत सर्वतोपरी मदत केली आणि आज फरीदा परत आपल्या २ मुली आणि पतीसोबत आहेत. भविष्यात अशा घटनांचा महिलांना सामना करावा लागू नये यासाठी आयोग परराष्ट्र मंत्रालयासोबत काम करणार आहे. तसेच महिलांची फसवणूक करणाऱ्या एजंट विरोधात ही कारवाई व्हावी यासाठी पोलिसांना सूचना देण्यात येतील.

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //



# मुलांचा भार आजी-आजोबांवर नको

आपलं मूल आजी आजोबांबरोबर असणं आणि पाळणाघरात असणं यात खरोखरच जमीन अस्मानाचा फरक आहे, पण म्हणून मुलं सांभाळणं ही आजी आजोबांची जबाबदारीच आहे, असं नाही म्हणता येणार. मुलं वाढवणं, त्यांचं संगोपन करणं ही निश्चितच आई–वडिलांचीच जबाबदारी आहे.

प्राची एक्के prachi.ekke@gmail.com

आपलं मूल आजी आजोबांबरोबर असणं आणि पाळणाघरात असणं यात खरोखरच जमीन अस्मानाचा फरक आहे, पण म्हणून मुलं सांभाळणं ही आजी आजोबांची जबाबदारीच आहे, असं नाही म्हणता येणार. मुलं वाढवणं, त्यांचं संगोपन करणं ही निश्चितच आई-वडिलांचीच जबाबदारी आहे. प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतात आणि त्या दोन्ही समजून घेणं आवश्यक आहे तेव्हाच या विषयाचं खरं गांभीर्य लक्षात येईल आणि याकडे बघण्याचा दृष्टिकोन ठरवता येईल. आजी-आजोबा आणि नातवंडं हे नातं कायम राहील; पण काळानुरूप त्याचे संदर्भ बदलतील एवढंच! हे जर कटाक्षाने लक्षात ठेवलं आणि या दोन्ही नात्यांचा समतोल साधला गेला तर, आजी-आजोबा बेबीसीटर नाहीत हे आई-वडिलांना आणि ते नातवंडांचे पालक नाहीत, हे आजी-आजोबांना वेगळं सांगायची गरजच भासणार नाही.

या सर्व विषयाला सुरुवात होण्याचे मूळ कारण आणि काही आई-वडिलांशी तसेच आजी-आजोबांशी साधलेला संवाद यातून या विषयाचा उलगडा करण्याचा हा प्रयत्न...

काही दिवसांपूर्वीच एक बातमी वाचली आणि या विषयाचे विचारचक्र सुरू झाले. त्यामुळे ती बातमी आधी सविस्तर मांडू म्हणजे त्याचा उलगडा करता येईल. 'नातवंडांचा सांभाळ करणे ही आजी-आजोबांची जबाबदारी नसून ते मुलांच्या आईवडिलांचे कर्तव्य आहे. आजी आजोबांवर त्यासाठी दबाव टाकता येणार नाही मुलांचा सांभाळ करायला आजी-आजोबा म्हणजे बेबीसीटर नाहीत.' अशा शब्दात पुण्यातील कौटुंबिक न्यायालयाने एका याचिकाकर्त्या महिलेला फटकारले. न्यायाधीश स्वाती चौहान यांनी हा निकाल दिला.

नातवंडांना मार्गदर्शन करणे, चुका सांगणे, पालन, पोषणात मदत करणे याला आजी आजोबांची जबाबदारी म्हणता येईलही, पण त्यांचा सांभाळ करणे ही पूर्णतः आई-वडिलांचीच जबाबदारी आहे, असे कोर्टाने स्पष्ट केले आहे. एक महिलेने तिच्या सासू-सासऱ्यांच्या विरोधात या संदर्भात न्यायालयात याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्या महिलेने २०१२ मध्ये कोर्टात तिला आणि तिच्या दोन मुलांना पोटगी मिळावी म्हणून दावा दाखल केला होता. नवरा आर्थिक मदत करत नाही म्हणून तिला मुलाच्या जन्मानंतर चार महिन्यांतच कामावर जावे लागले. काही दिवस मुलाचा सांभाळ सासू-सासऱ्यांनी केला. त्यानंतर ते फिरायला गेले. तसेच त्यांच्या दुसऱ्या मुलाकडे ते गेले. सासू-सासरे मुलांचा सांभाळ करीत नाहीत म्हणून तिला नाईलाजाने मुलांना पाळणाघरात ठेवावे लागत होते. या प्रकरणी तिने न्यायालयात दावा दाखल केला होता.

'नातवंडांचा सांभाळ करणे, ही सासू-सासऱ्यांची जबाबदारी आहे,' अशी भूमिका तिने कोर्टात मांडली होती. कोर्टाने तिची भूमिका अयोग्य ठरवली. आजीआजोबांना उतारवयात नातवंडांचे ओझे होऊ नये. वार्धक्य हे त्याचे स्वतःचे आयुष्य निवांत जगण्याचे वय आहे. भारतीय कुटुंबामध्ये आजी-आजोबांनाच नातवंडे सांभाळण्यासाठी पर्याय म्हणून पाहिले जातात. त्यांनी आयुष्यभर कष्ट केलेले असतात. उतारवयात त्यांना त्यांचे आयुष्य जगायचे असते. त्यांचे स्वतःचे मनोरंजनाचे, प्रवासाचे काही नियोजन असतात. त्यांचे काम बेबीसीटींग करणे नाही, असे कोर्टाने स्पष्ट केले.

## आजी-आजोबांवर हे नातं लादू नका : ॲड. प्रगती पाटील

बेबीसीटर म्हणजे तुम्ही सकाळी ठरावीक वेळेला मुलाला तिथे सोडता आणि संध्याकाळी ठरवीक वेळेला घेऊन येता. त्या मधल्या वेळेत मुलाला सांभाळणे ही त्या पाळणाघराची जबाबदारी असते. ते त्यांचं कामच असतं. त्यासाठी तुम्ही पैसे मोजता, पण आजी आजोबा म्हणजे त्या ठरावीक वेळेत मुलांना सांभाळणे इथपतच मर्यादित नाहीत. संस्कार, प्रेम, आपुलकी या भावना तिथे असतात त्यामुळे ती त्यांची जबाबदारी होऊ शकत नाही. प्रत्येकाला आपली कर्तव्य माहित असतात. आजी-आजोबा आहेत ते त्याचं कर्तव्य करणारच, पण तुम्ही त्यांच्यावर हे नातं लादू नका. ती त्याची ड्यूटीच आहे असं समजणं चुकीचं आहे. हल्लीच्या चौकोनी कुटुंबांमध्ये सुनेला सासू-सासरे नको असतात ती त्यांना डस्टबिन म्हणते, म्हणजे जेव्हा त्या आजी-आजोबांना तुमची गरज असते तेव्हा तुम्ही त्यांना बघता का? नाही, फक्त तुम्हाला गरज असली की, त्यांना जवळ करायचं इतर वेळेस डस्टबिन म्हणायचं हे कितपत बरोबर आहे. 'गिव्ह अँड टेक' ही संकल्पना नात्यांमध्ये यायला लागलीये, हे योग्य आहे का याचा विचार व्हायला हवा. नाती ही नाती आहेत ती प्रेमाने आणि आपुलकीने जपली पाहिजेत. असा एक अतिशय महत्त्वाचा संदेश देणे हा याबाबतचा निकाल देताना केला गेलेला विचार होता. अशा शब्दांत कौटुंबिक न्यायालयातील वकील ॲड. प्रगती पाटील यांनी हा मुद्दा स्पष्ट केला.



त्या म्हणतात, पूर्वी संयुक्त कुटुंब असायचे. त्यात मुलं वाढत होती. आजी-आजोबा, काका-काकू, आत्या अशी नाती तिथे एकत्र नांदत होती. त्यांच्या सानिध्यात मुलं आपोआपच वाढत होती. त्यामुळे

बेबीसीटर ही संकल्पनाच नव्हती. आता तसं होत नाही. आता सासू-सासरे ही मुलींसाठी अडचण असते मग त्यांची आठवण कधी येते, तर डिलिव्हरीच्या वेळेस, किंवा मुलं सांभाळण्यासाठी. सध्या एक चित्र सारखं दिसतं. लग्न करून परदेशी स्थायिक व्हायचं म्हणजे कोणतीच जबाबदारी घ्यायला नको पण मुलाला जन्म द्यायचा निर्णय घेतला की मग तिकडे या गोष्टींसाठी माणसं मिळत नाहीत किंवा तिथे तो खर्च परवडत नाही म्हणून सासू-सासऱ्यांना बोलावून घ्यायचं, आईला बोलावून घ्यायचं हे प्रमाण खूप वाढलंय, मग त्यावेळेस त्यांना हे सगळं झेपणार आहे का याचा विचार केला जातो का? पण सासू-सासरे किंवा आई-वडील मात्र त्यावेळेस मुलांची गरज आहे म्हणून जातातच.



**ॲड. प्रगती पाटील**

स्वार्थासाठी त्यांना बोलावून घ्यायचं. त्यांना काम करायला लावायचं हे योग्य आहे का? आयुष्यभर त्यांनीही खस्ता खाललेल्या असतात. कष्ट केलेले असतात आणि मग ते या पातळीवर आलेले असतात. त्यावेळेस ते त्यांच्या कुटुंबासाठीच झटलेले असतात आणि मग थकून कुठेतरी थांबलेले असतात अशावेळी पुन्हा आता माझाही संसार तुम्हीच ओढा. माझ्या मुलांनाही तुम्हीच सांभाळा ही सक्ती करणं पूर्णपणे चुकीचं आहे. आयुष्याच्या या टप्प्यावर तरी त्यांना त्यांचं आयुष्य जगता यायला हवं. आजी-आजोबा होणं एन्जॉय करता यायला हवं असं ते नातं आहे. हे नातं जबरदस्तीचं होऊ शकत नाही. त्यांची शारीरिक, मानसिक आणि भावनिक क्षमता लक्षात घेऊन योग्य तो निर्णय आताच्या पिढीने घ्यायला हवा, असा सल्लाही ॲड. प्रगती पाटील यांनी आवर्जून दिला.

# ‘माझ्यातली आई, माझ्या आईतली आई आणि माझ्या सासूबाईंमधली आई एकच आहे’

मी स्वतः एका मुलीची आई आहे, खरं तर लग्नानंतर जवळजवळ बारा वर्षांनी आमची मुलगी आमच्या आयुष्यात आली. तोपर्यंत सासू-सासरे अगदीच थकलेले होते, शारीरिक तक्रारी सुरू झाल्या होत्या. त्यामुळे नातीचा प्रत्यक्ष सांभाळ करणं त्यांच्यासाठी कठीण होतं आणि त्यांनी तो करावा अशी अपेक्षाही कधी केली नाही. सर्वप्रथम मी स्वयंपाकाला बाई लावली. जेणेकरून सर्वांना जेवण वेळेवर मिळावे आणि माझ्या मुलीकडे मला लक्ष देता यावे. या दिवसांत मी माझी नव्हतेच मुळी, माझं सर्व विश्व तिने व्यापलं होतं; पण याच काळात खऱ्या अर्थाने समृद्ध झाले मी. 'आईची' खऱ्या अर्थाने ओळख झाली मला आणि याच काळात नव्याने उमगल्या त्या म्हणजे माझ्या 'सासूबाई'. सासू-सूनांमधला वाद, मौन, अढी कुठल्याकुठे पळून गेली. आपण आज जे आपल्या पिलासाठी करतोय ते 'सर्व', काही वर्षांपूर्वी आपल्या आईने 'आपल्यासाठी' आणि सासूबाईंनी आपल्या 'नवऱ्यासाठी' केलंय याची जाणीव झाली. माझ्यातली 'आई', माझ्या आईतली 'आई' आणि माझ्या सासूबाईंमधली 'आई' ही वेगळी नसून एकच आहे याची प्रकर्षाने जाणीव झाली आणि त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलला. माझ्याही नकळत मी त्यांना समजून घ्यायला लागले. त्यांच्या शेवटच्या काळात त्या मला म्हणाल्या देखील, की तुझ्याशी बोललं की मन कसं मोकळं झाल्यासारखं वाटतं, तू कशी सगळं ऐकून घेतेस आणि समजावून सांगतेस, त्यामुळे तू सांगितलेलं सगळं पटतं. त्यांचे हे बोल त्यावेळी मनाला एक वेगळीच उभारी देऊन गेले, हे भावनिक मत मांडलंय सुचिता वाडेकर या एका सुजाण गृहिणीने.

ती म्हणते, एक गृहिणी म्हणून न्यायालयाच्या या निर्णयाचे



**सुचिता वाडेकर**

मी स्वागतच करेन कारण मलाही असे वाटते की मुलांची सर्वस्वी जबाबदारी ही मुलांच्या आई वडिलांचीच असते. घरात आजी आजोबा असणं ही खरे तर चांगली गोष्ट आहे, आजी आजोबांमुळे नातवंडांना हक्काचे सवंगडी मिळतात, जे त्यांच्याबरोबर त्यांच्या वयाचे होऊन बोलतात, नातवंडांना समजून घेतात आणि समजावून सांगतात देखील, परंतु याचा अर्थ असा नव्हे की नातवंडांचा सांभाळ त्यांनीच करावा किंवा त्यांनी तो केला पाहिजे. आयुष्यभर कष्ट करून मुलांना वाढवताना त्यांचीही ससेहोलपट झालेली असते, स्वतःसाठी असे जगायचे राहून गेलेले असते आणि त्यामुळे या उतार वयात त्यांनी जर स्वतःसाठी जगायचे ठरवले तर त्यात गैर ते काय आहे, उलट त्यांचा तो हक्क आहे. प्रत्येकाला स्वतःची अशी एक स्पेस हवी असते आणि ती प्रत्येकाने एकमेकांना द्यायला हवी. तसेच आजी-आजोबांच्या वयापरत्वे येणाऱ्या शारीरिक तक्रारी यांचादेखील विचार मुलांनी करायला हवा. अशावेळी मुलांनी स्वतःहून स्वतःच्या मुलांची जबाबदारी स्वीकारून आजी-आजोबांना त्यांचा हक्काचा वेळ द्यायला हवा. 'आतापर्यंत तुम्ही आमच्यासाठी जगलात, आता थोडे स्वतःसाठीही जगा' असे हक्काने सांगितले तर आयुष्यभर स्वतःचा विचार न करता घेतलेल्या कष्टाचे सार्थक झाल्याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर नक्की पाहायला मिळेल आणि निदान यासाठीतरी मुलांनी स्वतःच्या मुलांची जबाबदारी स्वतः घ्यायला हवी, असे माझे प्रामाणिक मत आहे. प्रत्येकाला एक स्वतःचं असं स्वतंत्र आयुष्यं असतं आणि ते स्वेच्छेने जगण्याचा त्याला पूर्ण आधिकार असतो हे जर एकमेकांनी समजून घेतले आणि स्वतःची, स्वतःच्या मुलांची जबाबदारी स्वतः घेतली तर मला वाटते की अशी वेळ कोणावरही येणार नाही.

# नातवंडं म्हणजे काय, दुधावरची साय...



लता जगताप

अहान जसा आमच्या घरात आला तसं आम्ही खूपच एन्जॉय केलं कारण अहानचे आजोबाही तेव्हा रिटायर झाले होते त्यामुळे त्यांनाही चांगली सोबत झाली. मी ३८ वर्षांची असताना आमच्या समोरच्या घरात लहान मुलं होती आणि त्यांनी मला पहिल्यांदा आजी केलं. यामुळे नातवंडांची आवड पहिल्यापासूनच होती. हे सांगतायत लता जगताप या आजी. त्या म्हणतात, अहानला सांभाळताना आम्ही काही वेगळ करतोय असं नाही वाटत आम्हाला दोघांनाही. नातवाला सांभाळताना आम्ही मुलांवर उपकार करतोय असं कधीच नाही वाटलं आम्हाला. आवडीने करतो सगळं. आम्ही घरात खुप समजुतीने या गोष्टी करतोय. एकमेकांचा विचार करतो. मला आणि अहानच्या आजोबांना नाटक, सिनेमाची खूप आवड आहे मग आम्ही ही आवड शनिवारी-रविवारी सुनेच्या आणि मुलाच्या वेळा बघून पूर्ण करतो. ते दोघेही आम्हाला आधीच अडवत नाहीत. इतक्या वर्षात पहिल्यांदाच नुकतेच शिमला-कुलू-मनाली ही सात-आठ दिवसांची ट्रिप केली. त्यावेळी मलाच जाऊ की नको असं झालं होतं. अहानची खूप काळजी वाटत होती. मीच त्याच्या मनाची तयारी करत होते. जर मम्मी पप्पा नसतील तर तू चावीने दार उघडशील का, नीट करशील का सगळं, असं सगळं मी त्याला सारखं सांगत होते. सूनेपेक्षा जास्त टेन्शन मीच घेतलं होतं पण त्यांनी सर्वांनीच या दिवसात नीट म्यानेज केलं सगळं, याचा आनंदही झाला परत आल्यावर. खरं तर अहानही आमच्याशी खुप जोडला गेलेला आहे. आम्ही बाहेर जाणार असलो तर त्याचा पहिला प्रश्न असतो की, तुम्ही परत कधी येणार. हेही खूप महत्त्वाचं आहे. आमच्या सगळ्यांमध्येच खूप छान एकोपा आहे. सून आणि मुलगाही सांगत असतात की तुम्ही तुमचं एन्जॉय करा आणि आम्हीही त्याप्रमाणे जमेल तसं करतो. माझ्या वयाच्या मैत्रिणी अहान लहान असताना मला सांगायच्या की चला ट्रीपला, बाहेर जात जा. देवाची ठिकाणं करा. काशीला जा. जगन्नाथपुरी बघा पण मी म्हणायचे माझा कृष्णच इथे आहे तर मला कुठे जायची काय गरज? शेवटी नातवंडं म्हणजे काय गं, दुधावरची साय... त्याची कसली अडचण!

### काय झालं सांभाळलं तर...

मी नोकरी करते ते त्यांच्या मुलाच्या संसारासाठीच ना, मग त्यांनी आमच्या मुलाला सांभाळलं तर बिघडलं कुठे? असा प्रश्न आहे, आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या स्वाती पाटीलचा. मी आयटी क्षेत्रात काम करते. वेळेचं बंधन नाही. कधीही जावं लागतं. क्लायंट परदेशी असला तर रात्री अपरात्रीही काम करावं लागतं. पर्यायच नसतो. अशावेळी पाळणाघरात ठेवायचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे आजी-आजोबाच असतात. मी ही धावपळ करते ती त्यांच्या मुलाच्या संसारासाठीच ना मग काय अडचण आहे त्यांनी थोडी मदत केली तर? आणि मूल होऊ दे हा त्यांचाच हट्ट होता. आम्ही अजून चालते फिरते आहोत तर मूल होऊन जाऊ दे, आम्ही सांभाळू नातवंडं असा त्यांचाच आग्रह होता.

### आमचा आणि मुलांमधला संवादच हरवलाय

मुलं आमची आहेत की आजी-आजोबांची तेच कळत नाहीये आता तर... ४० वर्षीय रंजिता आपला त्रागा आता असा व्यक्त करते. ती म्हणते, नातवंडं झालं म्हणून घरात खूपच आनंदी वातावरण होतं. सगळंच सुरळीत होतं. आजी-आजोबांनी आनंदाने त्याला आपलसं केलं. नातवंडाचं करताना त्यांचा आनंद ओसंडून वाहत असायचा मग आम्हीही काही बोललो नाही. त्यांच्या नात्याला कशाला दुखवायचं म्हणून गप्प राहिलो. अनेकदा त्यांना सांगितलं की, 'तुम्ही खुप अडकून राहू नका. तुम्हाला फिरायचं असेल तर फिरून या. आराम करा' पण त्यांनी कधीच ऐकलं नाही. त्यांनी नातवंडं हेच त्यांचं विश्व बनवलं पण, आता असं झालय की आमचा आणि आमच्या मुलामधला संवादच हरवलाय. आम्ही काही बोललो की आजी-आजोबाच मध्ये बोलतात. त्याच्या बाबतचे निर्णय हक्काने घेतात. मूल आमचं आहे की त्यांचं हेच कळत नाही अनेकदा. सुरवातीला आम्ही त्यांची भावनिक गुंतागुंत बघून दुर्लक्ष केलं पण आता कधी कधी खुप त्रास होतो याचा. मुलगाही थोडा मोठा झालाय त्यामुळे त्यालाही काही गोष्टी स्वतःहून कराव्याशा वाटतात त्यावेळी त्याचीही चिडचिड होते.

### मुलाला वाढताना नाही पाहू शकलो ती इच्छा नातवंडात पूर्ण करतोय

बागेत आजोबांबरोबर खेळणारा आयूष खरंच खूप खूश होता. पाटील आजोबा म्हणाले, मी आणि आयूष रोज येतो या बागेत. तो मनोसोक्त खेळतो मी थोडा व्यायाम करतो. थोडा आराम करतो, मध्येच त्याच्याबरोबर खेळतो. तसा दिवसभर माझ्याबरोबरच असतो. त्याचे आई-वडील सकाळीच जातात. यायला संध्याकाळ होते तोपर्यंत मीच असतो त्याच्यासाठी आणि तो माझ्यासाठी. पण मस्त एन्जॉय करतो आम्ही एकमेकांची कंपनी. कामाच्या व्यापात मुलाला वाढताना नाही बघू शकलो पण नातवंडाला बघतोय. आनंद आहे. सून सकाळी आमचा स्वयंपाक करून जाते. मी दुपारी आयूषला शाळेतून आणलं की आम्ही दोघे जेवतो.

पान ३२ वर ▶




महाराष्ट्र राज्य आयोगाच्या पदाधिकाऱ्यांनी मे महिन्यात राज्यातील विविध कारागृहांना भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांनी वाशीम येथील कारागृहाची तपासणी केली.








आयोगाच्या सदस्य देवयानी ठाकरे यांनी धुळे कारागृहाची तपासणी केली. या वेळी ठाकरे यांनी कारागृह अधिकाऱ्यांबरोबर बैठकही घेतली.



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी पुण्यातील येरवडा कारागृहाला भेट दिली.




राज्य महिला आयोगाच्या वतीने आयोजित सायबर सुरक्षा विषयक समितीच्या बैठकीत बोलताना आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर.




नवी दिल्ली येथे आयोजित एका चर्चासत्रात राज्य महिला आयोगाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या नावीन्यपूर्ण संकल्पनांची माहिती आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी दिली.

# तारिणी परतली




साद प्रतिनिधी

भारतीय नौदलातील महिला अधिकाऱ्यांची आयएनएसव्ही तारिणी या नौकेवरील जगप्रवास मोहीम नुकतीच यशस्वी पार पडली. तब्बल १९४ दिवस, २१,६०० सागरी मैलांचा प्रवास अशी ही पृथ्वीप्रदक्षिणा होती. १० सप्टेंबर २०१७ रोजी गोव्यातून सुरू झालेला हा प्रवास २१ मे रोजी गोव्यात परतल्यानंतर समाप्त झाला. या सागरकन्यांचे स्वागत करण्यासाठी संरक्षण मंत्री निर्मला सीतारामन, नौदल प्रमुख एडमिरल सुनील लांबा आणि सहा महिला अधिकाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. समुद्री मार्गाने पृथ्वी परिक्रमा करणाऱ्या पहिल्याच आशियाई महिला ठरल्या आहेत. परतल्यानंतर या शूर महिला अधिकाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधानांनी त्यांच्या धाडसाचे कौतुक केले.

लेफ्टनंट कमांडर वर्तिका जोशी, लेफ्टनंट कमांडर प्रतिभा जामवाल, लेफ्टनंट कमांडर पद्मपल्ली स्वाती, लेफ्टनंट ऐश्वर्या बोद्धापती, लेफ्टनंट शोरगप्पन विजया, लेफ्टनंट पायल गुप्ता यांचा या चमूत समावेश होता. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये या सहा महिला नौदल अधिकारी समुद्री मार्गे जगभ्रमंतीला निघाल्या होत्या. यासाठी गेल्या दोन वर्षांपासून सहा जणींनी तयारी केली होती. दक्षिण आफ्रिकेतील केप टाऊन हे या भ्रमंतीतील अखेरचं बंदर होतं. त्यानंतर मार्चमध्ये ही बोट परतीच्या प्रवासाला निघाली. या प्रवासात महिला नौदल अधिकाऱ्यांनी २१ हजार ६०० सागरी मैल अंतर पार केलं. या मोहिमेला 'नाविका सागर परिक्रमा' असे नाव देण्यात आले होते.

यापूर्वी कमांडर दिलीप दोंदे यांनी भारताची पहिली विश्व सागरपरिक्रमा आयएनएसव्ही 'म्हादई' या शिडाच्या नौकेच्या साह्याने केली. नंतर त्याच नौकेवर स्वार होत लेफ्टनंट कमांडर अभिलाष टॉमी यांनी विनाथांबा सागरपरिक्रमा केली होती. आता तिसरी विश्व सागरपरिक्रमा ही महिला चमूची पार पडली असून त्यासाठी आयएनएसव्ही तारिणी ही नवी शिडाची नौका गोव्यातच बांधण्यात आली होती. ५६ फूट लांबीच्या या नौकेत आणखी काही अद्ययावत बदल करण्यात आले होते. या प्रवासादरम्यान या महिलांनी चार

ठिकाणी थांबे घेतले. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, फॉकलंड आणि दक्षिण आफ्रिकेत मिळून चार बंदरांवर या बोटीने थांबे घेतले. ५५ फूट लांबीच्या या बोटीतून प्रवास करताना या सागरीकन्यांनी समुद्रातील जैव विविधता, पर्यावरण याचा अनुभव घेतला. हवामानातील बदल त्यानुसार नौकेच्या प्रवासात करावा लागणारा बदल, समुद्री वारे अशा थराराक अनुभव गाठीशी घेऊन हा चमू आज गोव्यात परतला.

'तारिणी' नौका गोव्याच्या बंदरात येताच सर्वांनी एकच जल्लोष करत या सागरकन्यांचं स्वागत केले. जगभ्रमंती करताना अनेकवेळा त्यांच्या शिडाला खराब हवामानाला तोंड द्यावे लागले. सात मीटर उंची पर्यंतच्या लाटा आणि ताशी ६० किलोमीटर वाऱ्याच्या प्रचंड वेगाचाही सामना करावा लागला. या प्रवासात शार्कने विशेष साथ देते त्यांच्या नौकेसोबत तो बराचकाळ प्रवास केला.

# अशी होती तारिणी..

- **आयएनएसव्ही तारिणी ५५ फूट लांबीची असून, ती गोव्यातच अक्वेरिस शिपयार्डने बांधली आहे. लाकूड आणि फायबरने बांधलेली ही नौका १८ फेब्रुवारी २०१७ रोजी नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली.**
- **तारिणी हे नाव तारा तारिणी मंदिरावरून ठेवण्यात आले. ही देवी नाविक आणि समुद्री व्यापाऱ्यांची देवता आहे. तारिणी या शब्दाचा एक अर्थ नौका असाही आहे. तारण करणारी, रक्षण करणारी असाही संस्कृतमध्ये तारिणीचा अर्थ आहे.**
- **या नौकेने दुरुस्ती, देखभाल, रसद यासाठी फ्रेमेंटल (ऑस्ट्रेलिया), लिटलटन (न्यूझीलंड), पोर्ट स्टॅनली (फॉकलंड), केप टाउन (दक्षिण आफ्रिका) या चार बंदरांवर थांबे घेतले.**
- **प्रशिक्षणाचा भाग म्हणून या नौकेवरील अधिकाऱ्यांनी २० हजार सागरी मैलांचा प्रवास केला होता.**
- **सागरी मार्गाने पृथ्वी परिक्रमा करण्याची आशियातील महिलांची ही पहिलीच वेळ होती. या मोहिमेसाठी दोन वर्षांपासून तयारी करण्यात आली.**



# ओळख महिला अधिकाऱ्यांची



**लेफ्टनंट कमांडर वर्तिका जोशी :** जोशी मूळच्या उत्तराखंडमधील गढवालच्या आहेत. त्या नेव्हल आर्किटेक्ट आहेत. जोशी तारिणीच्या कमांडिंग ऑफिसर होत्या. माणूस म्हणून आपण किती क्षुद्र जीव आहोत, ते समुद्रात गेल्यानंतर समजते, अशी प्रतिक्रिया जोशी यांनी व्यक्त केली.



**लेफ्टनंट ऐश्वर्या बोद्धापती :** बोद्धापतीही नेव्हल आर्किटेक्ट आहेत. त्या तेलगंणमधील हैदराबादच्या आहेत. या मोहिमेत त्या २०१६मध्ये सहभागी झाल्या.



**लेफ्टनंट पायल गुप्ता :** पायल गुप्ता यांचा जन्म उत्तराखंडमधील डेहराडूनचा आहे. तारिणीमध्ये त्यांच्या लॉजिस्टिक ऑफिसर अशी जबाबदारी होती. उद्दिष्ट साध्य करताना सुरुवातीला भीती वाटली तरीही डगमगू नका, असे त्या सांगतात.



**लेफ्टनंट प्रतिभा जामवाल :** जामवाल हिमाचल प्रदेशातील आहेत. २०११मध्ये त्या नौदलात रुजू झाल्या. आयएनएस हंसा या नौकेवर त्या एअर ट्रॅफिक कंट्रोलर आहेत.



**लेफ्टनंट शोरगप्पन विजया :** विजया मणिपूरच्या आहेत. त्या उत्कृष्ट गायिकाही आहेत. मुलीही सागरी सफर करू शकतात हे आम्ही सिद्ध केले आहे, असे त्या म्हणाल्या.



**लेफ्टनंट पेद्रपल्ली स्वाती :** स्वाती विशाखापट्टणममधील आहेत. तारिणीवर त्यांच्याकडे एअर ट्रॅफिक कंट्रोलर आणि नेव्हिगेशन ऑफिसर म्हणून जबाबदारी होती. एनसीसीत असल्यापासून त्यांना नौदलाचे आकर्षण होते. तिनेही २०१७मध्ये केप ते रिओ स्पर्धेत भाग घेतला होता.

## परिक्रमेचे टप्पे –

- **पहिला टप्पा**
  गोवा ते फर्मेंटल. हे अंतर ४५९० सागरी मैल आहे.
- **दुसरा टप्पा**
  फर्मेंटल ते लिटलटन. अंतर - ३३२० सागरी मैल
- **तिसरा टप्पा**
  लिटलटन ते फॉकलंड. सर्वांत मोठा टप्पा - ४७८० सागरी मैल
- **शेवटचा टप्पा**
  केपटाऊन ते गोवा.
- **एकूण प्रवास**
  साडेआठ महिने

| | |
|---|---|
| **सुरुवात** | **१० सप्टेंबर २०१७** |
| **शेवट** | **२१ मे २०१८** |
| **प्रवासाचा कालावधी** | **१९४ दिवस** |
| **प्रवासाचे अंतर** | **२१,६०० सागरी मैल** |
| **नौकेवरील प्रवासी** | **६** |

## सागरी परिक्रमेचे निकष

- परिक्रमा जेथून सुरू होते, तेथेच संपायला हवी
- या काळात कोणत्याही कालव्यातून जाता कामा नये
- सर्व रेखावृत्ते पार करणे आवश्यक
- नौकेने विषुववृत्ताला दोन वेळा फेरी मारणे आवश्यक
- किमान २१,६०० सागरी मैलांचे अंतर पार करणे बंधनकारक
- केप लुविन, केप हॉर्न आणि केप ऑफ गुड होप या तिन्ही केप्सना वळसा घातला पाहिजे.




**(सौजन्य : लोकमत)**

# रेल्वे स्टेशनवर मिळणार स्वस्त सॅनिटरी नॅपकिन

साद प्रतिनिधी

रेल्वे बोर्डाने रेल्वेसाठी स्वच्छतागृह बांधणीचे नवीन धोरण मंजूर केले असून, त्या अंतर्गत आता रेल्वे स्टेशनवर कंडोम आणि सॅनिटरी नॅपकीनही विक्रीसाठी उपलब्ध करून दिले जाणार आहेत. त्याचा लाभ प्रवाशांबरोबरच रेल्वे स्थानकाच्या परिसरात राहणाऱ्या लोकांनाही घेता येणार आहे.

रेल्वे स्थानकांच्या परिसरात स्वच्छतागृहांची पुरेशी सोय उपलब्ध नसल्याने लोक उघड्यावरच मूत्रविसजर्न करतात आणि शौचाला बसत असल्याचे अनेक ठिकाणचे चित्र आहे त्यामुळे रेल्वे स्थानकांवरील अस्वच्छताही वाढते आहे. त्यामुळे रेल्वे स्थानकांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात स्वच्छतागृहे उभारण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचे धोरण रेल्वे बोर्डाने स्वीकारले आहे.

महिला व पुरुषांसाठी अशा प्रकारची स्वतंत्र स्वच्छतागृहे रेल्वे स्थानकाच्या परिसरात उभारली जाणार असून तेथेही कंडोम आणि स्वस्तातील सॅनिटरी नॅपकिन विक्रीसाठी ठेवले जाणार आहेत. त्यातून लोकांना स्वच्छतेची सवय लागेल अशी अपेक्षा आहे. देशात एकूण ८५०० रेल्वे स्थानके असून, तेथे प्रत्येकी दोन स्वतंत्र स्वच्छता गृहे उभारण्याचे काम खासगी संस्थांच्या मदतीने केले जाणार आहे. बीओटी तत्त्वावर ही उभारणी केली जाणार असून, त्याच्या स्वच्छता आणि देखरेखीचे कंत्राट स्वयंसेवी संस्थांना किंवा खासगी कंपन्यांना दिले जाणार आहे.

**(सौजन्य : न्यूजहंट)**



# हजला जाणार एकट्या महिला



साद प्रतिनिधी



भारतातील ४५ वर्षवरील मुस्लिम महिलांना आता कोणत्याही पुरुष सहप्रवाशाविना (महरम) एकट्याने हज यात्रा करता येणार आहे. देशाच्या इतिहासात प्रथमच यंदा १३०८ महिला एकट्याने हज यात्रा करणार आहेत. फक्त महिलांना कुटुंबाची परवानगी घ्यावी लागेल आणि किमान तीन महिलांचा गट करावा लागणार आहे.

यापूर्वी मुस्लिम महिलांना कुटुंबातील एखाद्या सदस्यासह उदा. पती, पिता, पुत्र, नातू अशा एखाद्या पुरुष सहप्रवाशासह (महरम) यात्रा करणे बंधनकारक होते. मात्र, ज्यांचा विवाह झालेला नाही, अशा महिलांची त्यामुळे मोठीच अडचण होत असे.

एकट्याने हज यात्रा करण्यासाठी केंद्र सरकारकडे आलेल्या अर्जांपैकी बहुतांश महिला केरळच्या आहेत. त्या खालोखाल उत्तर प्रदेशचा क्रमांक लागतो. ज्या महिलांनी अर्ज केले, त्यांना लॉटरी सिस्टीममधून सवलत देऊन थेट यात्रेची परवानगी देण्यात आली आहे.

या महिलांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, जुलै महिन्यांत लसीकरण करण्यात येणार आहे. तीन जुलैपासून लसीकरण मोहिमेला प्रारंभ होणार आहे. हज यात्रेसाठी महिलांची पहिली तुकडी १४ जुलैला भारतातून रवाना होणार आहे. दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अखेरचे विमान १८ जुलैला रवाना होणार आहे.

या बाबत दिल्ली स्टेट हज कमिटीचे उपकार्यकारी अधिकारी मोहसीन अली यांनी सांगितले की, महिलांना एकट्याने हज यात्रा करता यावी, यासाठी सौदी अरेबियाचे भारतातील राजदूत सौद अल् सती यांचे मोलाचे सहकार्य केले आहे. त्यांनी या महिलांना व्हिसा मिळवून देण्यासाठी गतिमान हालचाली केल्या. ई-व्हिसाचीही व्यवस्था करून दिली. हजला एकट्याने जाण्याचा अधिकार मुस्लिम महिलांना आहे, अशी भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली होती. त्यासाठी सौदी अरेबियाकडे पाठपुरावाही करण्यात आला होता. केंद्रीय अल्पसंख्याक कल्याण मंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांनी या कामी महत्त्वाची भूमिका बजावली.

**१,२८,००२**
**सरकारी यंत्रणेमार्फत हज यात्रेला जाणारे भाविक**

**४७ टक्के**
**हज यात्रेकरूंतील महिलांचे प्रमाण**

**४७ हजार**
**खासगी माध्यमातून हजला जाणारे भाविक**



# एका जिद्दीचा प्रवास...

**लष्करशाहीच्या जोखडातून मातृभूमीची मुक्तता करून देशात लोकशाहीची पाळेमुळे रुजवण्यासाठी अथकपणे झटत असलेल्या नेत्या म्हणून अवघे जग आँग सान स्यू की यांना ओळखते. राष्ट्रपित्याची ही कन्या आता अवघ्या म्यानमारींसाठी दाव म्हणजे मातेसमान बनली आहे. एका अर्थाने पित्याचा वारसा समर्थपणे पुढे नेणाऱ्या स्यू कींचा हा जिद्दीचा प्रवास रोहिंग्याच्या समस्येमुळे वादग्रस्त वळणावर येऊन ठेपला आहे. असे असले, तरी स्यू कींचा हा जिद्दीचा प्रवास जाणून घेणे प्रेरणादायीच ठरणारे आहे.**

**गोपाळ जोशी**
gopal.joshi19gmail.com

आपला सख्खा शेजारी असलेला म्यानमार अलीकडे रोहिंग्यांच्या समस्यांमुळे सतत चर्चेत राहतो आहे. यंगून, तेथील श्वेडेगॉन पँगोडा, मंडाले (स्थानिकांच्या भाषेत मँडले) असे काही परवलीचे शब्द वगळता हा सख्खा शेजारी आजही तसा अपरिचितच आहे. म्यानमार म्हटले, की मघा घेतलेल्या नावांबरोबर आणखी एक नाव चटकन डोळ्यांसमोर येते ते म्हणजे आँग सान स्यू कींचे. म्यानमारला आधुनिक जगाशी जोडून घेण्यासाठी आणि मायदेशातील लष्करी राजवट उलथून पाडण्यासाठी अथक संघर्ष करणाऱ्या या नेत्याविषयी तमाम भारतीयांच्या मनातही एक आपुलकीची भावना तरळून जाते. या स्यू कींचा जीवनप्रवासही तसाच रंजक आणि प्रेरणादायी आहे.

गेल्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात भारताबरोबरच ब्रह्मदेशावरही ब्रिटिशांची राजवट होती. भारतातील स्वातंत्र्यलढ्याचे लोण ब्रह्मदेशातही पसरले होते. त्यातील ठळक नाव म्हणजे आँग सान. भारताला १९४७मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रह्मदेशातही स्वातंत्र्याच्या मागणीने उचल खाल्ली आणि आँग सान यांच्या नेतृत्वाखाली तमाम ब्रह्मी एका झेंड्याखाली एकवटले. १९४८ मध्ये ब्रह्मदेशालाही ब्रिटिशांनी स्वातंत्र्य बहाल केले. या सर्व प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावणारे आँग सान यांना ब्रह्मी जनतेने

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //




राष्ट्रपित्याचे स्थान दिले. याच आँग सान यांची स्यू की ही कन्या. घरातले शेंडेफळ. १९४४मध्ये राजधानी रंगूनमध्ये (आता याच शहराचे नामकरण यंगून असे झाले आहे) स्यू की यांचा जन्म झाला. १९४८मध्ये ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्यानंतर काहीच काळात आँग सान यांची हत्या झाली. आँग सान यांच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. स्यू कींची आई खिन क्यी यांनी कुटुंबाची जबाबदारी घेतानाच ब्रह्मी सरकारमध्येही आपले स्थान निर्माण केले. परिणामी १९६०मध्ये खिन क्यी यांची भारत व नेपाळच्या राजदूत म्हणून ब्रह्मी सरकारने नियुक्ती केली. या नव्या नियुक्तीमुळे खिन क्यी मुलांसह नवी दिल्लीत दाखल झाल्या. दिल्लीतल्या जिझस अँड मेरी कॉन्व्हेंट स्कूलमध्ये स्यू की शिक्षणासाठी दाखल झाल्या. माध्यमिक शिक्षण संपल्यानंतर लेडी श्रीराम महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. राज्यशास्त्राची पदवी त्यांनी मिळवली. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी त्या थेट ब्रिटनलाच गेल्या.

ऑक्सफर्ड विद्यापीठात राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान आणि अर्थशास्त्र या विषयात त्यांनी १९६७ मध्ये पदवी मिळवली. पुढच्याच वर्षी राज्यशास्त्र विषयात त्यांनी एम.ए.ची पदवी मिळवली. तिबेटी संस्कृती व साहित्याचा अभ्यास करणारे मायकेल अँरिस यांच्याशी याच काळात स्यू की यांचा परिचय झाला आणि पुढे तो वाढत गेला. ऑक्सफर्डमध्ये एम. ए.ची पदवी घेतल्यानंतर स्यू की न्यूयॉर्कला गेल्या. तेथे संयुक्त राष्ट्रसंघात त्यांनी तीन वर्षे नोकरीही केली. १९७२ मध्ये मायकेल यांच्याशी विवाह केल्यानंतर स्यू की पुन्हा लंडनला परतल्या. मायकेल व त्यांचा सुखाचा संसार सुरू झाला. अलेक्झांडर व किम अशी दोन मुले आणि नवरा मायकेलच्या सहवासात स्यू की सुखाने जगत होत्या. ब्रह्मी साहित्याची त्यांना आवड होती. त्यामुळे त्यांनी पुन्हा लंडन विद्यापीठातून याच विषयात एम. फिल. चा अभ्यासही सुरू केला.

स्यू की यांचे परदेशातील हे जीवन स्वप्नवत वाटावे असे होते. सार कसे सुरळीत सुरू होते. आँग सान यांच्या कन्येबाबत ब्रह्मी लष्करशहांच्या मनात तशी अढी नव्हती आणि मायदेशातील परिस्थितीविषयी फारशी माहिती नसल्याने स्यू कीही लंडनमध्ये ब्रह्मी सरकारसाठी काही काळ काम करू लागल्या होत्या.

स्यू कींच्या आयुष्याला नवे वळण मिळाले ते १९८८ मध्ये. वयोवृद्ध खिन क्यींची प्रकृती बिघडल्याने त्यांच्या शुश्रुषेसाठी स्यू की यंगूनमध्ये दाखल झाल्या. आईच्या प्रकृतीला आराम पडला, की परत लंडनला परतायचे, असा त्यांचा वचार होता. तथापि, नियतीच्या मनात काही वेगळेच होते. मायदेशी रंगूनमध्ये परतलेल्या स्यू कींना देशाचे आणि देशवासीयांचे असे काही दर्शन घडले, की त्या अंतर्बाह्य हादरून गेल्या आणि देशातील दमनकारी लष्करी राजवटीविरुद्ध संघर्षाचा निर्णय त्यांनी घेतला.

स्यू कींनी जेव्हा मायदेश सोडला, तेव्हा त्या अवघ्या १५ वर्षांच्या होत्या. १९६०मध्ये ने विन या लष्करी अधिकाऱ्याने चिनी राज्यकर्त्यांच्या मदतीने ब्रह्मदेशावर आपली हुकूमत प्रस्थापित करण्यासाठी पावले टाकली होती. लष्करी राजवटीचा जाच नव्हता आणि तसे काही कळण्याचे स्यू कींचे ते वयही नव्हते. कळत्या सवरत्या वयात त्या परदेशात होत्या. इकडे मायदेशातील परिस्थिती दिवसेंदिवस इतकी हलाखीची होत गेली, की सर्वसामान्यांना जगणेच मुश्कील झाले होते. त्यातच लष्करी राजवटीने बाह्य जगाशी संपर्क तोडलेले होते. आग्नेय आशियायी देशांशी ब्रह्मदेशचे संबंध सुरळीत होते, पण त्या काळात त्या देशांतही विकासाचे नवे पर्व सुरू झाले होते. आर्थिक, सामाजिक पातळीवरचे चित्र वेगाने बदलत होते. शीतयुद्धाचे चटके या भागालाही बसत होते. त्यातच लष्करी दमनशाहीमुळे सर्वसामान्य ब्रह्मी जनतेचे जगणे दिवसेंदिवस अवघड बनत जात होते. त्याची परिणती संघर्षात होणारच होती. तशी ती १९८०च्या दशकात झाली. जनरल ने विन या क्रूरकर्म्याविरुद्ध ब्रह्मी जनता एकवटू लागली होती. तथापि, अनेकानेक निर्बंधांमुळे बाह्य जगाला ब्रह्मदेशातील अंतर्गत परिस्थितीविषयी नेमकी माहितीच मिळत नव्हती. अशाच काळात स्यू की १९८८मध्ये मायदेशी परतल्या होत्या. लष्करशाहीविरुद्ध संघर्ष टोकाला पोटला होता आणि ने विनची दमनशाहीही उग्र बनली होती.

बौद्ध वचारांचा पगडा असलेल्या स्यू की यांना अल्पावधीतच

हे सगळे त्रासदायक वाटू लागले आणि त्यांनी ने विन यांच्याविरुद्ध बंडाचा झेंडा खांद्यावर घेतला. राष्ट्रपित्याची लाडकी कन्या लष्करशाहीविरुद्ध उभी ठाकल्याने सर्वसामान्य ब्रह्मी जनता मोठ्या आशेने तिच्या झेंड्याखाली एकवटू लागली. लष्करातून निवृत्त झालेल्या अनेक अधिकाऱ्यांनाही जनरल ने विन यांची धोरणे अमान्य होती. ने विन तहहयात राष्ट्रप्रमुख बनण्याच्या खटपटीत होते आणि त्यासाठी त्यांनी आपल्याविरुद्ध जाणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांवरही वरवंटा फिरवायला सुरवात केली होती. सगळे वातावरण गढूळ झाले होते. अशातच स्यू कींनी लोकशाहीचा नारा दिला आणि स्यू कींच्या या नाऱ्याला देशभरातून सकारात्मक प्रतिसाद मिळू लागला. ने विन यांच्या धोरणांना विरोध करणारे माजी लष्करी अधिकारीही स्यू कींच्या गोटात दाखल झाले आणि त्यातून नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी पक्षाचा जन्म झाला. ब्रह्मदेश आणि स्यू की यांचे भवितव्य बदलून टाकणारी ही घटना होती.



मायदेशी परतल्यानंतर अल्पावधीतच स्यू की यांची लोकप्रियता किती वाढली होती, याचा एकच दाखला येथे पुरेसा ठरेल. यंगूनमधील श्वेडेगॉन पॅगोडा सर्वांनाच परिचित आहे. ब्रह्मदेशचा तो महान सांस्कृतिक ठेवा आहे. याच पॅगोडाच्या परिसरात १९८८ मध्ये स्यू कींनी सभा घेतली. या सभेला सुमारे पाच लाख ब्रह्मी उत्स्फूर्तपणे जमले होते. स्यू कींच्या या लढ्याला बाह्य जगातून व विशेषतः पाश्चिमात्य देशांतून मोठा प्रतिसादही मिळू लागला. लोकशाहीवाद्यांच्या या संघर्षापुढे अखेर जनरल ने विन यांना मान तुकवावी लागली. १९८८च्या ऑगस्टच्या ८ तारखेला (८. ८. ८८ रोजी) ने विन यांना सत्ता सोडावी लागली. ब्रह्मदेशात ८८८८ क्रांती या नावाने ही घटना ओळखली जाते. ने विन यांची जागा दुसरा लष्करशहा थान श्वे यांनी घेतली. त्यांनी स्यू की व अन्य लोकशाहीवाद्यांशी चर्चा सुरू केली, पण लोकशाहीची तत्त्वे पाळण्यास साफ नकार दिला. १९९० मध्ये ब्रह्मदेशात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी पक्षाला ५७ टक्क्यांवर मते मिळाली. त्यामुळे आता हा पक्ष सत्तेवर येईल, असे वाटत असतानाच जनरल थान श्वे यांनी ही निवडणूकच रद्दबातल ठरवत लष्करशाहीचा खुंटा अधिक बळकच केला. सत्ता सोडण्याऐवजी सत्तेचे पाश अधिक बळकट करत लोकशाहीवादी नेत्यांना तुरुंगात डांबले. त्यांचा छळ सुरू केला. स्यू की यामुळे डगमगल्या नाहीत.

त्यांनी थान श्वे राजवटीविरुद्ध संघर्ष सुरूच ठेवला. १९८९ मध्ये थान श्वे यांच्या लष्करी राजवटीने स्यू कींना नजरकैदेत ठेवले. तरीही या कारावासातूनही त्यांनी संघर्षाची भूमिका कायम ठेवली. त्यामुळे १९९० मध्ये त्यांना मानवतावादासाठी दिला जाणारा साखारॉव हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला, तर १९९१मध्ये प्रतिष्ठेचा नोबेल पुरस्कारही जाहीर झाला. थान श्वे सरकारचा यामुळे जळफळाट झाला. नजरकैदेत असलेल्या स्यू कींना नोबेल स्वीकारण्यासाठी मुक्त करण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे स्यू कींची मुले अलेक्झांडर व किम यांनी स्टॉकहोममध्ये हा पुरस्कार स्वीकारला. नोबेलची सर्व रक्कम सर्वसामान्य ब्रह्मी नागरिकांच्या आरोग्य व शिक्षणासाठी खर्च करण्याचा निर्णय स्यु कींनी घेतला आणि त्याची व्यवस्थाही लावून दिली. पुढे सुमारे बारा वर्षांनी याच रकमेवरून थान श्वे यांनी स्यू कींना पुन्हा न्यायालयीन लढाईत अडकवण्याचा प्रयत्न केला. नोबेलची रक्कम स्यू की परदेशातच खर्च करत असून, त्यांनी या रकमेवरचा कोणतेही कर भरलेला नाही, असा आरोप स्यू कींवर ठेवण्यात आला होता. पण पुढे त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही, हा भाग अलाहिदा.

एकीकडे हा लढा सुरू असतानाच पक्षांतर्गत मतभेदांचाही सामना स्यू की यांना करावा लागला. स्यू की या हटवादी नेत्या असल्याचा दावा करत अनेक माजी लष्करी अधिकाऱ्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली. नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी पक्षाचे पहिले अध्यक्ष व माजी लष्करी अधिकारी ऑंग ग्यी यांनी प्रथमपासूनच स्यू कींना पाठिंब्याचे धोरण स्वीकारले होते. १९९१ मध्ये स्थापन झालेल्या सरकारचे पंतप्रधान यू नू यांनी स्यू की व त्यांच्या सहकाऱ्यांना सरकारमध्ये सहभागाचे आवाहन केले, पण स्यू की यांनी ते नाकारले. त्यांनी नकार दिल्याने ऑंग ग्यी यांनीही यू नू यांचा हा प्रस्ताव फेटाळून लावला. पण पुढे या दोन नेत्यांतही इतके तीव्र मतभेद झाले, की ऑंग ग्यी यांनीही पक्षातील अनेक नेत्यांवर जोरदार टीका करत पक्ष सोडला. स्यू की हटवादी असून, अनेक नेते कम्युनिस्ट आहेत, अशी जहरी टीका ग्यी यांनी केली होती.

स्यू की यांनी पक्षातील अशा काही नेत्यांची टीकाही शांतपणे स्वीकारली आणि पक्षात तरुणांना अधिक वाव देण्यास प्रारंभ केला. त्यातून पक्ष अधिक बळकट होत गेला. तरुण रक्त अधिक जोमाने लढू लागले. १९९६ मध्ये स्यू कींना नजरकैदेतून मुक्त करण्यात आले. नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसीचे नेते टीन ऊ आणि क्यी मॉंग यांच्याबरोबर स्यु की यंगूनमध्ये ९ नोव्हेंबर १९९६ रोजी पक्षाच्या बैठकीसाठी जात असताना युनियन सॉलिडॅरिटी अँड डेव्हलपमेंट पक्षाने पाठवलेल्या सुमारे दोनशे गुंडांनी स्यू कींच्या मोटारीवर जीवघेणा हल्ला केला. त्यात स्यू कींना फारशी इजा झाली नाही, पण ऊ व मॉंग गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे अवघे म्यानमानर आणि जगही हादरले. या घटनेच्या चौकशीचे आश्वासन सरकारने दिले, पण पुढे हे सगळेच प्रकरण थंड बस्त्यात गेले. या घटनेनंतरही स्यू कींनी न डगमगता पक्षबांधणी आणि लष्करशाहीविरुद्धचा संघर्ष कायम ठेवला. त्यांची संघर्षाची भूमिका कायम राहिल्याने लष्करशाहीने त्यांना पुन्हा नजरकैदेत ठेवले.

या काळात स्यू कींना एकाचवेळी अनेक आघाड्यांवर संघर्ष करावा लागला. पती मायकेल यांना कर्करोग असल्याचे निदान आधीच झाले होते. पती व मुलांचा विरह मानसिक थकवा वाढवणारा होता.



मायकेल अँरिस १९९५च्या अखेरीस म्यानमारमध्ये आले होते. तीच त्यांची शेवटची भेट ठरली. त्यानंतर मायकेल यांचे कर्करोगाने निधन झाले. मात्र, त्यांच्या अंत्यदर्शनासाठी व अंत्यसंस्कारांसाठीही स्यू की यांना जाता आले नाही. पतीच्या अंत्यसंस्कारांसाठी स्यू कींनी परदेशी जावे, असा प्रस्ताव लष्करशहांनी ठेवला होता. तथापि, पुन्हा आपल्याला म्यानमारम ध्ये परतू दिले जाणार नाही, हे लक्षात आल्याने स्यू की यांनी लष्करशहांचा हा प्रस्ताव साफ फेटाळून लावला. पतीच्या निधनानंतर परदेशात मुले एकटी राहू लागली. तोही ताण स्यू कींना येत होताच. त्यातच मायदेशात पक्षाच्या कार्यकर्ते व समर्थकांवर फिरवला जाणारा वरवंटा स्यू कींना अस्वस्थ करत होता. त्यातच नजरकैदेत असलेल्या स्यु कींना कोणालाही भेटू दिले जात नसल्याने या काळात त्या जवळपास एकाकी जीवन जगत होत्या. या सर्वांचा परिणाम त्यांच्या आरोग्यावरही झाला. त्या गंभीर आजारी पडल्या. पण जिद्द आणि सकारात्मक विचारांमुळे त्या त्यातूनही बाहेर आल्या.

नजरकैदेत असताना मी बुद्ध विचारांचे परिशीलन करत होते. त्यातून मला सकारात्मक ऊर्जा मिळाली. महात्मा गांधीच्या तत्त्वज्ञानाचाही मी अभ्यास केला. त्यातूनही मला उभारी मिळाली, असे स्यू कींनी एका मुलाखतीत सांगितले. बौद्ध विचारसरणीचा त्यांचा अभ्यास दांडगा आहे. त्यातच म्यानमार हा बौद्धधर्मीय देश असल्याने देशातील बौद्ध भिख्खूंनाही त्यामुळेच स्यू की वंदनीय वाटतात. भगवान बुद्ध व महात्मा गांधींनी अहिंसेचे तत्त्वज्ञान मांडले आहे. त्याचाच आधार घेऊन मी अहिंसक मार्गाने माझा संघर्ष सुरू ठेवला, हे खरे आहे. परंतु, माझी ही भूमिकाही पूर्ण राजकीय आहे. राजकीय शस्त्र म्हणूनच मी याचा वापर केला, असेही त्यांनी पुढे एकदा स्पष्ट केले. यातूनही स्यु कींमधील मुरलेल्या राजकारण्याचे स्वच्छ दर्शन घडते. १९९९मध्ये म्यानमारमध्ये इंधनाचे दर वाढल्याने सर्वसमान्य ब्रह्मींमध्ये संतापाची लाट उसळली आणि त्यातून सरकारविरोधात पुन्हा एकदा संघर्, उफाळून ला. यावेळचे वेगळेपण असे होते, की बौद्ध भिख्खूंनी या असंतोषाचे नेतृत्व सुरू केले. यंगूनसह देशभरातील रस्त्यांवर भिख्खू उतरले आणि त्यांनी सरकारविरोधात जमनत संघटित करण्यास प्रारंभ केला. यंगूनमध्ये स्यू कींच्या घराजवळूनही रोज भिख्खू जात आणि स्यू की त्यांचे दर्शन घेत, त्यांच्याशी संवाद साधत. त्यावेळी बौद्ध भिख्खूंना अडवण्याचे धाडस सरकार करू शकले नाही.

स्यू की यांना २००३ मध्ये नजरकैदेतून मुक्त करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी पक्षाच्या नेत्यांबरोबर देशव्यापी दौरा सुरू केला. देशाच्या उत्तरेकडील दपायिन खेड्याजवळ स्यू कींच्या ताफ्यावर पुन्हा काही गुंडांनी हल्ला केला. हल्लेखोरांवर कोणतीच कारवाई झाली नाही, पण या गटनेच्या चौकशीचे शुक्लकाष्ठ मात्र स्यु कींच्याच मागे लागले आणि त्यांची पुन्हा नजरकैदेत रवानगी झाली. स्यू कींवरील हल्ले व त्यांना सातत्याने नजरकैदेत ठेवले जाण्याच्या घटनांची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक गांभिर्याने घेतली जाऊ लागली. त्यातूनच स्यू कींच्या मुक्ततेसाठी संयुक्त राष्ट्रसंघासह जगभरचे देशप्रमुख व विविध संघटनांनी थान श्वे सरकारवर दबाव आणण्यास सुरवात केली. परिणामी सुमारे १५ वर्षांच्या नजरकैदेतून स्यू कींची अखेर २०१०मध्ये कायमची सुटका झाली. त्याच वर्षी म्यानमारमध्ये सार्वत्रिक निवडणूकही घोषित झाली. मात्र, त्यात भाग घेण्यास स्यू कींनी नकार दिला. सरकार जोपर्यंत लोकशाहीची हमी देत नाही, तोपर्यंत निवडणुकांत भाग घेणार नाही, ही भूमिका त्यांनी कायम ठेवली. साहजिकच त्या निवडणुकीत विरोधी युनियन सॉलिडिरिटी अँड डेव्हलपमेंट पार्टी विजयी झाली. या पक्षाच्या सरकारवरही लष्करशहांचे वर्चस्व होते. मात्र, नजरकैदेतून मुक्त झालेल्या स्यू कींनी पुन्हा एकदा नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी पक्ष बळकट करत लष्करशहा व सरकारला आव्हान दिले आणि देशाच्या घटनेत बदलांसाठी पुढाकार घेण्यास लष्करशाहीला भाग पाडले. त्यातून म्यानमारमध्ये घटनादुरुस्ती होऊन नागरिकांना लोकशाहीचे हक्क दिले गेले. पुढे २०१५ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी पक्षाने घवघवीत यश मिळवत सत्ता मिळवली. नव्या सरकारच्या प्रमुख स्यू कीच असतील, असे मानले जात होते. तथापि, लष्करशहांनी त्यांचा हा बेत तडीस जाऊ नये म्हणून घटनेत एक तरतूद केली होती. परदेशी नागरिकाशी विवाह केलेल्या व्यक्तीस देशाचे प्रमुखपद स्वीकारता येणार नाही, अशी ही तरतूद आहे. स्यू कींनी या तरतुदीचा मान ठेवत आपल्या विश्वासू सहकाऱ्याची देशाच्या प्रमुखपदी नियुक्ती केली खरी, पण सत्तेची सूत्रे आजही स्यू की यांच्याकडेच आहेत. नव्या सरकारने स्यू कींसाठी सरकारच्या सल्लागार असे नवे पद निर्माण केले असून, स्यू की सध्या या भूमिकेतून म्यानमारच्या सत्ता व राजकारणार अंकुश टेवून आहेत.

स्यु की सत्तेवर आल्याने जगाने निश्वास सोडला. पण तो अल्प काळच टिकला. म्यानमारमधील राखीन प्रांतातील रोहिंग्यांच्या समस्येने २०१६मध्येच उचल खाल्ली होती. हजारो रोहिंग्या मुस्लिमांनी जमेल त्या मार्गाने शेजारचा मलेशिया, बांगला देश इंडोनेशियात स्थलांतर सुरू केले. या हजारो स्थलांतरितांचे करायचे काय, असा प्रश्न या देशांना पडला आहे. गेल्या वर्षी राखीन प्रांतात झालेल्या हिंसाचारानंतर लाखो रोहिंग्यांनी स्थलांतर केल्याने हा प्रश्न चिघळला आहे. रोहिंग्या मुस्लिम म्यानमारचे नागरिक नाहीत, अशी भूमिका स्यू की व त्यांच्या सरकारने घेतल्याने जगभरच्या मानवी हक्क संघटना संतप्त झाल्या असून, एकेकाळी प्रशंसक असलेल्या याच संस्था, संघटना आता स्यू कींवर जोरदार टीका करत आहेत. स्यु कींचे नोबेल परत घ्यावे, अशी टोकाची मागणीही त्यातूनच पुढे आली होती. स्यू कींचा मानवतावाद फक्त ब्रह्मी व त्यातही बौद्ध नागरिकांपुरताच मर्यादित आहे का, असा प्रश्न मानवी हक्क संघटना करत आहेत. रोहिंग्यांचा प्रश्न कायमच असून, या प्रश्नामुळे स्यू कींच्या नेतृत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहे. असे असले, तरी म्यानमारमधील स्यू कींची लोकप्रियता कायम आहे. अपघातानेच, पण जिद्दीने सुरू झालेला स्यू कींचा हा प्रवास आजही कायम आहे. म्यानमारचा विकास लोकशाही मार्गानेच घडवून आणण्यावर त्या ठाम आहेत.



'रूपे'री पडद्यावर...

# नाही म्हणजे नाहीच!

**गेल्या काही वर्षांत महिलाप्रधान चित्रपटांची संख्या हिंदी चित्रपटसृष्टीत वाढते आहे. महिलांच्या प्रश्नांकडे, समस्यांकडे संवेदनशीलतेनं पाहणारी एक नवी फळी चित्रपटसृष्टीत तयार झाली आहे. या चित्रपटांमुळं महिलांकडं पारंपरिक नजरेनं पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोनही बदलत आहे. हा हळूहळू घडणारा बदलही आश्वासक आहे. अशा काही चित्रपटांचा परिचय या सदरातून आपण करू घेऊ या. या वेळचा चित्रपट आहे 'पिंक'...**

## अनिरुद्ध नगरकर

आपण असं म्हणतो, की ज्याच्याविषयी आदर आहे अशा माणसानं समजावून सांगितलं, तर नीट कळतं. चुकत असेल, तरी अशा माणसानं एक मुस्कटात लगावून सांगितलं, तर डोक्यात कायमचा प्रकाश पडतो.

'पिंक' हा अनिरुद्ध रॉयचौधरीचा नवा हिंदी चित्रपट म्हणजे अशीच आपल्या श्रीमुखात लगावलेली एक सणसणीत चपराक आहे. आणि इथं हे समजावून सांगतोय साक्षात अमिताभ बच्चन. म्हणजे अर्थातच त्यानं साकारलेलं दीपक सहगल हे एका वकिलाचं पात्र; पण अमिताभ बच्चन या व्यक्तिरेखेशी जोडला गेलेला सारा आदर आपोआपच त्या पात्राला लाभतो आणि त्याच्या तोंडून जणू काही हा ज्येष्ठ समाजपुरुषच आपले कान (विशेषतः भरकटलेल्या तरुणाईचे) उपटतोय, असं वाटत राहतं.

इथं मी आता दीपक सहगल न म्हणता अमिताभच म्हणतो. कारण बच्चनचा 'ऑरा' असा काही आहे आणि त्याची इमेज अशी काही 'लार्जर दॅन लाइफ' आहे, की अनेकदा तो साकारत असलेल्या पात्रांनाही हे वलय चिकटतं. कधी कधी हे वलय अनावश्यक व हानीकारक असतं आणि कधी कधी ते फारच उपकारक ठरतं. इथं अमिताभ बच्चन या प्रत्यक्षातल्या व्यक्तीचा समाजमनावर असलेला प्रभाव आणि त्याच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा दबदबा त्यानं साकारलेल्या वकिलाच्या भूमिकेला

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

भलताच पूरक ठरलाय. अशा या अमिताभनं आपल्या खर्जातल्या आवाजात शांतपणे, पण खणखणीतपणे आपल्याला इथं चार गोष्टी सुनावल्या आहेत. अनेक वर्षं मूल्यशिक्षणाचे तास घेऊनही जे कदाचित साध्य होणार नाही, ते इथं त्याच्या दमदार आवाजामुळं सहज साधून गेलं आहे.

अमिताभ सांगतो, जेव्हा एखादी मुलगी 'नाही' म्हणते तेव्हा त्याचा अर्थ 'नाही' असाच असतो. अगदी सोपं आहे हे! इथं ती मुलगी किंवा तरुणी कशाला 'नाही' म्हणतेय हे सांगायची गरज नाही. एखादी तरुणी महानगरात रात्री उशिरा घरी येते, किंवा मैत्रिणींसोबत एकटी राहते, किंवा पार्टीला जाते, किंवा मित्राशी हसून बोलते, किंवा त्याच्या पाठीवर सहज थाप मारते, किंवा हस्तांदोलन करते, किंवा मद्यपान करते किंवा तुमच्यासोबत रात्री डिनरला येते... तेव्हा याचा अर्थ ती कायम तुम्हाला 'उपलब्ध' असते, असं नाही. वास्तविक आता या वास्तवाशी अनेक तरुण जुळवून घेत आहेत. किंबहुना त्यांना याची हळूहळू जाणीव होते आहे, असं म्हणू या. पण तरीही समाजात उच्च सत्तास्थानी असलेले, सरंजामी मानसिकता असलेले आणि अशिक्षित अशा अनेक वर्गांमध्ये मुलींविषयी अजूनही हीच भावना आहे. या भावनेला खतपाणी घालणारी पोलिस यंत्रणा मुलींसाठी आणखीनच बिकट स्थिती निर्माण करते.

'पिंक' हा सिनेमा या सगळ्यांच्या चुकीच्या वागण्याचा पर्दाफाश करतो आणि शेवटी मुलींशी नीट कसं वागलं पाहिजे, याचा 'कायदेशीर' धडाच देतो. यातल्या कथेला नेपथ्य आहे ते दिल्लीचं. 'निर्भया' प्रकरणाचा बॅकड्रॉप निश्चितच दिसतो. दिल्ली हे शहर मुलींसाठी कायमच असुरक्षित गणलं गेलं आहे. त्यामुळं तिथल्या मुलींचा, तरुणींचा लढा अजूनच अवघड आहे. मीनल (तापसी), फलक अली (कीर्ती कुल्हारी) आणि आंद्रेया (आंद्रेया तारिआंग ) या तीन तरुणी दिल्लीत एका फ्लॅटमध्ये भाड्याने राहत असतात. मीनल दिल्लीतलीच आहे. मात्र, तिचे नाटकाचे प्रयोग वेळी-अवेळी संपतात, याचा घरच्यांना त्रास होऊ नये म्हणून ती बाहेर राहतेय. फलक अली लखनौची आहे आणि दिल्लीत एका मॅगेझिनमध्ये काम करते. तिसरी आंद्रेया ही मेघालयमधली (पण दिल्लीत सरसकट नॉर्थ-ईस्टवाली म्हणून ओळखली जाणारी), ती दिल्लीत एका कंपनीत काम करतेय. पण ती केवळ ईशान्य भारतातील मुलगी असल्याने ती 'तसलीच' असणार, असा भंपक समज तिच्या शहरात जवळपास सगळ्यांचा असतो.

या तीन मुलींपैकी फलकच्या एका मित्राच्या ओळखीतून एका रॉक कॉन्सर्टनंतर या तिघी राजवीर नावाच्या तरुणाचं डिनरचं आमंत्रण स्वीकारतात. हा राजवीर म्हणजे एका प्रभावशाली राजकारण्याचा पुतण्या असतो. राजवीर आणि त्याच्या मित्रासोबत त्या सूरजकुंड येथील एका रिसॉर्टमध्ये जातात. तिथं गेल्यानंतर राजवीर मीनलशी गैरवर्तणूक करण्याचा प्रयत्न करतो. मीनल त्याला जबरदस्ती करण्यास विरोध करते आणि 'नाही' असं निक्षून सांगते. मात्र, तरीही राजवीर जबरदस्ती करतो, तेव्हा ती जवळचा मद्याची बाटली उचलून त्याच्या डोक्यात मारते. त्याच्या डोळ्याला गंभीर इजा होते. त्यानंतर या तिघी तिथून पळून जातात.

सिनेमा सुरू होतो तो या प्रसंगापासून. तिघीही भयभीत अवस्थेत टॅक्सीतून घरी येतात आणि तिकडे राजवीरला त्याचे मित्र ॲडमिट करतात. काही काळानंतर राजवीर आणि त्याचा एक मित्र या मुलींना, विशेषतः मीनलला धडा शिकवण्याचा विडा उचलतो. दीपक सहगल (अमिताभ) हा वकील या मुलींच्या समोरच राहत असतो. तो रोज मीनलला जॉगिंग ट्रॅकवर पाहत असतो. दीपक सहगलची पत्नी रुग्णशय्येवर असते. त्यानंही वकिली सोडलेली असते. कालांतरानं या मुलींच्या मागे सुरू झालेला त्रास तो पाहतो आणि अखेर त्यांची केस लढविण्याचा निर्णय घेतो.

राजवीर आणि त्याचे मित्र आधी या मुलींच्या मालकावर त्यांनी फ्लॅट सोडून जावे, म्हणून दबाव आणतात. नंतर फलकविषयी विकृत फोटो तयार करून तिच्या संपादकाकडं पाठवतात. त्या संपादकावर वरून दबाव आल्यानंतर तिचीही नोकरी जाते. नंतर त्या पोलिसांत तक्रार करायला जातात, तर त्यांच्याविरुद्धच खुनाचा प्रयत्न केल्याचा उलटा एफआयआर दाखल होतो. मीनलला पोलिस कोठडीत राहावं लागतं. इथं दीपक सहगल मैदानात उतरतो. दुसऱ्या दिवशी तो आपला कोट चढवून फलकच्या दारी येतो, तेव्हा आपल्याही मनगटांत जोर आल्यासारखं जाणवतं.

इथून पुढं उत्तरार्धात खरा न्यायालयीन लढा सुरू होतो आणि तोच या सिनेमाचा हायपॉइंट आहे. दिग्दर्शकानं बाकी तपशिलाचा फापटपसारा आवरून फक्त अशी कृत्ये करणाऱ्यांच्या मानसिकतेचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. राजवीरचा वकील प्रशांत मेहरा (पीयूष मिश्रा) या मुलीच कशा बदफैली होत्या, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न सातत्यानं करतो. त्याच्या या संतापजनक आरोपांनी या तिघीही अनेकदा भर कोर्टात पेटून उठतात, संतापतात, ओरडतात, कधी थिजून जातात, जागीच गोठून जातात, अश्रूंना वाट करून देत राहतात... हा कोर्टरूम ड्रामा रंगतो तो दीपक सहगलच्या, अर्थात अमिताभच्या खणखणीत बचावानं. अमिताभचे या वेळचे संवाद अत्यंत प्रभावी आहेत आणि बऱ्याचदा प्रेक्षकांच्या टाळ्या-शिट्ट्या मिळविणारे आहेत. मुलींकडं चुकीच्या नजरेनं पाहणारे, त्यांना सदैव आपल्या मालकी हक्काचा माल मानणारे, त्यांचा कधीही गैरफायदा घेता येईल अशा भ्रमात असणारे अशा सगळ्यांनाच हे संवाद छान खणखणीत तोंडात वाजवतात.

अमिताभ चौऱ्याहत्तराव्या वर्षीही ज्या तडफेनं इथं कोर्टात आपली भूमिका साकारतो, ते पाहून वाटतं, की कुठून येते एवढी ऊर्जा या माणसात! राजवीरची उलटतपासणी घेत असतानाचा प्रसंग या दृष्टीनं पाहण्यासारखा आहे. त्याच्या डोळ्यांतली ती जरब प्रसंगी संपूर्ण देहबोलीत उतरते आणि त्याचा तो खर्जातला, ऑथरेटिव्ह आवाज! दिग्दर्शकाला नेमका संदेश द्यायचाय आणि त्यासाठी त्यानं खुबीनं या प्रसंगांची निवड त्यासाठी केलीय. इथं न्यायव्यवस्थेला साक्षी ठेवून दोन्ही बाजू जणू आपापली शस्त्रं परजत आहेत आणि लढाई लढत आहेत. इथं मुलींची बाजू

अर्थातच न्यायाची आहे. याचं कारण त्यांच्यावर झालेला अन्याय आपल्याला ढळढळीतपणे समोर दिसतोय. विशेषतः नंतर त्यांना धडा शिकवण्याची राजवीर व त्याच्या मित्राची भाषा ऐकून हे लोक डोक्यात जातात. यांना कायमचा धडा शिकवायला पाहिजे, असं वाटून मुठी वळू लागतात. नंतर एका प्रसंगात हे लोक एका गाडीतून मीनलचं अपहरण करतात आणि तिला भयानक टॉर्चर करून, तिच्यावर जवळपास बलात्कार करून तिला पुन्हा घराजवळ आणून टाकतात. हा प्रसंग बघताना प्रचंड अस्वस्थ व्हायला झालं. याउप्पर काही बोलू नये, काही लिहू नये... शरमेनं डोकं खाली घालून बसावं... स्वतःच्याच चार तोंडात मारून घ्याव्यात... एवढा तो प्रसंग अंगावर येणारा आणि प्रत्ययकारक झालाय.

तापसी पन्नू ही अभिनेत्रीही लक्षात राहते. खूपच संवेदनशीलतेनं तिनं यातली मीनल साकारली आहे. तापसीकडं यापुढंही लक्ष राहील. कीर्ती कुल्हारी आणि आंद्रिया या दोघींनीही उत्तम कामं केलीयत. राजवीरच्या भूमिकेत अंगद बेदी आणि त्याच्या वकिलाच्या भूमिकेत पीयूष मिश्रा यांनी चांगली कामं केली आहेत.

एंड स्क्रोलला मग शेवटी तो सुरुवातीला वर्णन केलेला प्रसंग दिसतो आणि त्या पार्श्वभूमीवर अमिताभच्या आवाजातील

'तू खुद की खोज में निकल,
तू किस लिए हताश है,
तू चल, तेरे वजूद की,
समय को भी तलाश है'

ही कविता ऐकू येते आणि सिनेमा संपतो.

एकूणच हा न चुकवावा असाच अनुभव आहे. हा सिनेमा पाहून देशभरातल्या तरुणांच्या नजरेतील 'पिंक' रंगाची ओळख बदलली तर अजून काय हवं!

---

# मुलांचा भार आजी-आजोबांवर नको

▶ पान १८ वरून

संध्याकाळी कामाला बाई येते. दुपारी अभ्यास, खेळ त्याचं चालतं. संध्याकाळी बाग ठरलेली. छान चाललंय. वयामुळे काही गोष्टी करताना थोडा कंटाळा येतो, थकल्यासारखं वाटतं पण मुलगा सून दोघेही समजूतदार आहेत.

## नातच करते आता मस्त सोबत

सायली म्हणत होती 'आजी हळू ये इथे पायरी आहे.' आजी तिचा हात धरून बागेत फिरत होत्या. म्हणाल्या, तूच आहेस गं माझी गुणाची बाय ती. मग आजींना भेटल्याशिवाय राहवेना. रुख्मिणी कामत नाव होतं त्यांचं. सायली त्यांच्या मुलीची मुलगी. आजी म्हणाल्या, खूप प्रेम आहे सायलीचं माझ्यावर. आता डॉक्टरांनी फिरायला सांगितलंय तर हीच आणते रोज मला या बागेत. हात धरून फिरवते. खूप सांभाळते. लहान होती तेव्हा आई वडील कामाला जातात म्हणून माझ्याकडेच वाढली. गुणी पोर एकदम. आता नववीत आहे. मुलीला गरज होती. मला म्हणाली माझ्या मुलीला सांभाळशील नाहीतर मला पाळणाघरात ठेवावं लागेल. मी म्हंटलं, सांभाळेन. मी नाही गरजेला मदत करणार तर कोण करणार पण 'जावयाचं पोर आणि जीवाला घोर' असं म्हणतात तर तसं नको. मला जमेल तसं करेन. नाही पटलं तर लगेच सांगा. यामुळे वाद नकोत. दोघेही हो म्हटले आणि सायली माझ्याकडे आली. आता तीच माझी काठी झालीये. ती लहान होती त्यावेळी वय खुप नव्हतं, करणं शक्य होतं पण सध्या काही वर्ष झाली तीच मला सांभाळतेय असं म्हणायला हरकत नाही.

एकंदर सगळ्या प्रतिक्रिया पाहिल्या तर एक वास्तव समोर येतं. शहरी जीवनातलं एक कठोर वास्तव म्हणजे दिवसभर कामात बुडालेले आणि घरी आल्यावर बाळाच्या गरजा भागवताना मेटाकुटीला आलेले आई-बाबा. त्यांना गरज असते थोड्या-फार म दतीची. अशावेळी बाळाला मोठं करताना आजी-आजोबांची भूमिका काय असावी आणि आई वडिलांचा त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन काय असावा हा खरा प्रश्न आहे. प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतात तशाच त्या यालाही आहेत आणि त्या दोन्ही समजून घेणं आवश्यक आहे तेव्हाच या विषयाचं खरं गांभीर्य लक्षात येईल आणि याकडे बघण्याचा दृष्टिकोन ठरवता येईल.

बाळाची आजारपणं, आई-बाबांचा कामानिमित्त किंवा फिरण्यासाठी प्रवास किंवा अचानक उद्भवलेलं ऑफिसचं महत्त्वाचं काम, अशा गरजेच्या वेळी आजी-आजोबांनी बाळासाठी उपलब्ध असणं हे आई-बाबांना केवढा आधार देऊन जातं हे शब्दांत नाही सांगता येणार. ज्यांना या गोष्टी अनुभवायला मिळाल्या नाहीत त्यांनाच याचं महत्त्व कळेल.

घरातच आजी-आजोबा असतील, तर त्यांचं बाळाबरोबरचं नातं नैसर्गिकपणेच उमलत जातं. आई-बाबा कामावर गेल्यावर त्यांच्याच देखभालीखाली बाळ वाढत असतं. त्याच गावात जवळच राहणारे आजी-आजोबासुद्धा दिवसाचा ठरावीक वेळ बाळासाठी देतात. तेवढ्यापुरतं पालकत्व निभावतात. परंतु हे काम त्यांनी आनंदानं स्वीकारलंय का, ही गोष्ट आई-बाबांना माहिती असणं आवश्यक आहे. बाळाच्या संगोपनासाठी आजी-आजोबा नेमका किती वेळ देऊ शकतील, काय काय करू शकतील याची चर्चा घरात म ोकळेपणाने व्हायला हवी. बाळाला सांभाळताना त्यांचा दिनक्रम बदलत नाही ना, त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा येत नाही ना, याचाही विचार निश्चितपणे व्हायला हवा.

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# ‘सुहिता’

## तुमच्यासाठी आयोगाचा
## मदतीचा हात

संकटात आहात?
माहिती हवीय?

Helpline

# ७४७७७२२४२४

## घाबरू नका..
## सहन करू नका...

## संपर्क साधा ‘सुहिता’वर

### महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची हेल्पलाइन

आयोगाशी संपर्क

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App



# लोकशाही तळातली

**भीम रासकर,** rscd.1994@gmail.com
राज्य समिती सदस्य, महिला राजसत्ता आंदोलन

**वित्त, कार्ये आणि कार्यकर्ते (फायनान्स, फंक्शन्स व फंक्शनरीज) ही तिन्ही ग्रापंचायतींची अंग महत्त्वाची असून, प्रत्येकाचा सुटा सुटा विचार करून चालणार नाही. तळातली लोकशाही व्यवस्था गतिमान करण्यासाठी या तिन्ही घटकांचा एकत्र विचार करण्याची गरज आहे.**

भारतीय राज्य घटनेतील त्र्याहत्तराव्या दुरुस्तीनंतर ग्रामपंचायतीला गावसंसदेचा दर्जा मिळाला आहे. गावाच्या विकासाची दिशा व धोरण ठरविण्याची जबाबदारी तसेच व्यक्तिगत विकासाच्या योजनांच्या अंमलबजावणीच्या निर्णय प्रक्रियेत ग्रामस्थांचा सहभाग अनिवार्य झाला आहे. असे असले तरी रूढी-परंपरांमुळे गावातील गरीब, वंचित व महिला ग्रामपंचायतीत जाण्याचे टाळतात असे वास्तव दिसून येते.

गाव विकासाच्या निर्णय प्रक्रियेत जन सहभाग वाढवण्यासाठी ग्रामपंचायतीचे संपूर्ण कामकाज माहिती असायला हवे. पंचायतीच्या प्रशासकीय पद्धतीविषयी सर्व तांत्रिक माहितीची स्पष्टता असावी, त्याच बरोबर लोकप्रतिनिधींची जबाबदारी, भूमिका व कर्तव्य याची माहितीही ग्रामसभा सदस्य असणाऱ्या ग्रामस्थांना होण्याकरिता 'ग्रामपंचायत वास्तव दर्शन' हा झिरो बजेट उपक्रम सर्वांगाने उपयुक्त आहे. आपल्या मनात याबाबत स्पष्टता हवी! हा उपक्रम गावात कशाला हवा? तर स्थानिक ग्रामस्थांना त्यांच्या स्वतःच्या ग्रामपंचायतीचा कारभार सुलभपणे समजून घेतला तरच ग्रामपंचायतीच्या कारभारात ग्रामसभा सदस्यांचा प्रभावी सहभाग वाढेल-हा या कार्यक्रमाचा प्रमुख हेतू आहे.

ग्रामपंचायतीचा संबंध रोजच्या जगण्याशी कसा येतो याविषयी ग्रामस्थांशी चर्चा करावी. ग्रामपंचायत गावविकासाचे नियोजन कसे करते हे समजून घेण्यासाठी पंचायतीत जाणे गरजेचे आहे, हे जाणावे. ग्रामपंचायत दर्शनासाठी जाण्याची तारीख व वेळ निश्चित करून ग्रामपंचायतीला सहीचे लेखी निवेदन द्यावे. ग्रामपंचायत भेटीच्या दरम्यान प्रत्येक गोष्ट समजून घेऊन त्याविषयी अधिक तपशील जमा करण्यास प्रत्येक सहभागीनी आवर्जून सांगावे. ग्रामपंचायत भेटीनंतर सरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांच्याशी खुला संवाद करून त्यांची निरीक्षणे नोंदविण्यास सांगावी. तद्नंतर खुली चर्चा होऊन प्रश्न व योजनांचा आराखडा नीटपणे बनू शकतो



या यंत्रणा दर्शन कार्यक्रमामुळे नेमके काय होईल? तर ग्रामपंचायतीच्या कामकाजाची ओळख वाढेल, लोकप्रतिनिधींशी ग्रामस्थांचा संवाद वाढेल, ग्रामपंचायतीशी लोकांचा संपर्क वाढेल, ग्रामपंचायतीविषयीची भीती कमी होण्यास मदत होईल व महत्त्वाचे म्हणजे रोजच्या कामासाठी कधीही सर्व ग्रामस्थ ग्रामपंचायतीत जातील.

ग्रामपंचायत यंत्रणादर्शन मोहिमेमुळे आपल्या हाताशी नेमके काय लागेल? लोक ग्रामपंचायतीचा कारभार आतून समजून घेतील, गाव कारभारात सर्वसामान्यांचा सहभाग वाढेल. ग्रामसभेतील ग्राम स्थांची उपस्थिती वाढेल व गावस्तरावरील गाव विकास समित्यांतील सर्व महिला व वंचित सदस्य सक्रिय होतील. ग्रामपंचायतीविषयीच्या पारंपरिक समजांना या कार्यक्रमामुळे छेद मिळेल, व्यक्ती म्हणून महिलांसह वंचितांचा आत्मविश्वास वाढेल, तसेच गट म्हणून वंचित समाज समूहांची ताकद वाढण्यास उपयोग होईल.

महिलांच्या सोबत पंचायतराजमध्ये काम करीत असतांना या व्यवस्थेला सप्तव्याधी जडल्याचे दिसते. युरोपीय महासंघाचा २०१५ मधील एक अहवाल वाचला होता त्यातही या विषयी नेमके लिहिले आहे. पहिला आजार आहे, लोकसहभागीतेचा! आज गावात संस्था, संघटना, शासन व अनेक अभियाने काम करीत आहेत, मात्र ग्रामस्थ सोडून बाहेरील लोकांची भागीदारी वाढत आहे. गावातील ग्रामस्थांचा विकासातील प्रत्यक्ष सहभाग कसा वाढवावा ही गंभीर समस्या आहे.

दुसरा आजार आहे उच्चवर्गीय वर्चस्वाचा. गावात जे पैसेवाले आहेत त्यांना गावातील सत्ता आपल्या हातात हवी आहे. त्याच बरोबर शासन संस्थाही गावावरचे आपले वर्चस्व कमी करण्यास तयार नाही. स्थानिक स्वराज्य संस्था या स्वायत्त संस्था आहेत असे म्हणतात पण त्यांना पुरेशी मोकळीक दिली जात नाही.

तिसरा आजार दिसतो तो, सर्व ग्रामपंचायतींना आज शासनाने स्वतःची सेवा केंद्र बनवून ठेवली आहेत. निर्णय केंद्र म्हणून त्यांना भूमिका घेण्याची संधीच दिली जात नाही. गावस्तरावर केंद्र व राज्याच्या योजना व अभियानापुरती त्यांची अभासी स्वायतत्ता टिकवून ठेवली जात आहे. गावस्तरावरील ग्रामपंचायती या गाव विकासाचे निर्णय केंद्र आहे असे सांगितले जाते पण व्यवहारात ते दिसत नाही.

चौथा आजार दिसतो तो म्हणजे धोरण आणि व्यवहार यांच्यामधले अंतराचे ऑडिट होत नाही. त्र्याहत्तराव्या घटनादुरुस्तीनंतर अनेक धोरणात्मक सुधारणा कागदावर झाल्याचे दिसते, पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी किती याचे ऑडीट होत नाही. धोरणं छान आहेत, पण त्याच्या अंमलजबावणीला पडलेले भगदाड कसे बुजविणार, हा गंभीर प्रश्न आहे. यातील नेमके अंतर समजले तर उपाय शोधता येतील.

पाचवा आजार दिसतो तो म्हणजे संपूर्ण पंचायतराज व्यवस्थेत सर्वसमावेशकता दिसत नाही. दलित, अपंग, आदिवासी, अल्पसंख्याक, भटके व विमुक्त समाज, महिला या सर्वांना

विकासात तसेच निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी करुन घेणारी सर्वसमावेशकता दिसत नाही. गावातील जाती जातींमधील व वर्गावर्गामधील परस्पर सत्तासंबंध समजून घेतल्याशिवाय विकासाच्या बाकी सर्व योजना बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. पंचायतस्तरावरील वंचित समूहांच्या शोषणाचे मर्म जाणून घेऊन पुढची दिशा व वाटचाल करावी लागेल.

सहावा आजार दिसतो, तो म्हणजे शासन व लोकप्रतिनिधींची नवीन शिकण्याची वृत्ती कमी आहे. गावाला, समाजाला पुढे घेऊन जाणारे नवे प्रयोग स्विकारण्याची इच्छा व राजकीय ताकद दिसत नाही. समाजात आज अनेक प्रयोग-संस्था, संघटनां व गावांच्या स्व-मदतीनं उभे राहत आहेत. पण ते स्विकारायला शासन व संस्था आज तयार नाही. या प्रयोगांचे यश पाहून शासनाने त्याचे सार्वत्रीकीकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण नवा प्रयोग कितीही चांगला असला तरी राज्य संस्था ते स्वीकारायला तयार होत नाही ही वस्तुस्थिती आहे. काही प्रयोग लोकहिताचे असतील तर त्याचे धोरणातही रूपांतर व्हायला हवे.

सर्वांत शेवटचा आजार दिसतो तो म्हणजे नागरी संस्थांना सोबत घेऊन काम करण्यात शासन संस्था कमी पडते. आम्ही पंचायतराजमधील कार्यकर्ते फक्त दोष तपासण्याचे काम करीत नाहीत, तर पंचायतीची व्यवस्था अधिक मजबूत होण्यासाठी कोणकोणते विकल्प असू शकतात याविषयी प्रत्यक्ष कार्यही करीत आहोत. अनेक वेळा फक्त प्रश्न उपस्थित केले जातात. आपण या प्रश्नांबाबतचे पर्याय नेमक्या कृतीतूनही देण्याचा प्रयत्न करीत आहोत. आम्ही स्वतः गेली सतरा वर्ष कारभारणींसोबतच या आजारांचा सामना करीत आहोत. महिलांना मिळालेल्या निम्म्या आरक्षणानं हे काम जरा सोपं झालं आहे; परंतु वर मांडल्याप्रमाणे आव्हानंही तितकीच गंभीर आहेत. सर्वांत मूळ घटक आहेत, ते या पंचायतीतील लोक. गावकरी व ग्रामपंचायत यातील दरी बुजली तर हे प्रश्न सुटू शकतात. त्यासाठी गावकऱ्यांनी सर्वप्रथम पहिलं पाऊल आपल्या मर्जीनं उचललं पाहिजे. त्यासाठी ग्रामपंचायत व यंत्रणा दर्शन मोहिम राज्यभर राबवली पाहिजे.

ग्रामपंचायत दर्शनाने लोक सरकारची भाषा शिकतील. लोकांसोबत आपण जे काम करतो तेव्हा आपली व लोकांची समजाची भाषा महत्त्वाची भूमिका बजावत असते. आज सरकारी आदेश, परिपत्रकांची भाषा खरेच सर्वसामान्यांना समजते का? पंचायतीत आज अतिवंचित समाज समूहही आहेत हे आपणासमोरचं वास्तव आहे. त्यांच्या दैनंदिन शोषणाला मुक्ती देऊन त्यांना या विकास प्रक्रियेत कसे सहभागी करून घेणार याची उत्तरे पंचायतींना शोधावी लागतील. ग्रामपंचायतीतील मनुष्यबळाचा क्षमताविकास, याचा विचार करतांना या वंचित घटकांचासुद्धा विचार करण्याची गरज आहे. पंचायतीसोबत काम करतांना आपल्या विचाराची आणि कामाची दृष्टी एकांगी असून चालणार नाही. गावातील सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा पंचायतीचा सर्वसमावेशक कार्यक्रम असला पाहिजे.



शहरांच्या आजूबाजूला असलेल्या खेड्यांचे रुपांतर हळूहळू शहरांत होत आहे. गावाचे शहर होतानाच्या प्रवासात नवनवे प्रश्नसुद्धा तयार होत आहेत. त्याकडे नीट लक्ष देऊन, पर्याय शोधावे लागतील. गावस्तरावरील मनुष्यबळाचा विचार करतांना हक्काधारित दृष्टिकोन ठेवून विचार होताना दिसत नाही. प्रत्येक जण फक्त सेवेचा व व्यक्तिकेंद्री लाभाचा विचार करून मार्गक्रमण करीत आहे. आज भारताचे ''डिजिटल इंडिया'' बनण्याचे स्वप्न आहे, पण कोकण व उत्तर महाराष्ट्राच्या विंध्य पर्वतरांगांत वसलेल्या नंदुरबार किंवा धुळ्यासारख्या भागात चोवीस तास इंटरनेट सेवा कशी पोहचेल, याचा विचार होताना दिसत नाही. ग्रामपंचायतीच्या सर्व सेवा ऑनलाइन झाल्या आहेत. पण जिथे विजेचे लोडशेडिंग असते व इंटरनेट सेवाच नाही तेथे हे कसे शक्य होईल याचा व्यावहारिक विचार झाला पाहिजे. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाबाबत मांडणी केली जाते तेव्हा त्या मांडणीला राज्य व्यवस्थेचा सावत्रपणा व लोकांच्या नकारात्मकतेची झालर असते. मराठवाड्यातील जनता जगण्याच्या मूलभूत प्रश्नांसाठी आजही संघर्ष करीत आहे हे वास्तव असले तरी मराठवाड्याच्या विकासाचा सकारात्मक शोध घेण्याची खूप गरज आहे. आदिवासी स्वशासन भागातील पेसा ग्रामपंचायतीचे नियम व नियमावली तयार झाली आहे, पण त्याचीही काटेकोर अंमलबजावणी होतांना दिसत नाही.

ग्रामपंचायतीच्या मनुष्यबळाचा विचार करतांना राज्य व केंद्राच्यास्तरावर परिशिष्ट ११ मधील २९ विषयांच्या हस्तांतराचा मुद्दा धोरणाच्या पातळीवर प्रथम सुटण्याची गरज आहे. केरळप्रमाणे सर्व २९ विषय पंचायतराजकडे सोपवायला हवेत. पंचायत स्तरावरील हे सर्व प्रश्न व अडचणींचा सर्वांनी मिळून सामना करण्याची गरज आहे. ज्या संस्था, संघटना, पंचायतीराजमध्ये काम करीत आहेत त्यांनी तरी किमान एकत्र येऊन या तळातल्या लोकशाहीच्या कामाला सुरुवात केली पाहिजे. वित्त, कार्ये आणि कार्यकर्ते (फायनान्स, फंक्शन्स व फंक्शनरीज) ही तिन्ही ग्रापंचायतींची अंग महत्त्वाची असून, प्रत्येकाचा सुटा सुटा विचार करून चालणार नाही. तळातली लोकशाही व्यवस्था गतिमान करण्यासाठी या तिन्ही घटकांचा एकत्र विचार करण्याची गरज आहे.

(लेखक रिसोर्स ॲण्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट या नवी मुंबईस्थित स्वयंसेवी संस्थेचे संचालक आहेत.)

# होरपळलेल्या चेहऱ्याला सावरताना...



## आशिष चांदोरकर

**पत्रकार आशिष चांदोरकर यांनी लिहिलेल्या मॅन ऑन मिशन महाराष्ट्र या पुस्तकात राज्य सरकारच्या काही महत्त्वाच्या योजनांच्या यशोगाथा समाविष्ट आहेत. याच पुस्तकातील राज्य महिला आयोगाने ॲसिड हल्ला पीडितांसाठी राबविलेल्या उपक्रमाची ही कहाणी...**

निर्दोष असताना नशिबी आलेल्या ॲसिडच्या चटक्यांनी आप्तस्वकीयांकडून मिळणारे प्रेम सपशेल जळते तेव्हा हळुवार मनाने विश्वास ठेवायचा तरी कोणावर? पण आयुष्य तितके कठोर नाही हे कुठल्यातरी टप्प्यावर अलगद जाणवतं, जेव्हा कुठलंही नातं नसलेली स्त्री पोळलेल्या मनावर अलगद फुंकर घालते...

''ॲसिड हल्ला झाल्यानंतर माझे दोन्ही डोळे गेले. माझा चेहरा विद्रूप झाला. त्या घटनेनंतर माझे नातेवाईक मला टाळू लागले. नातेवाइकांचं सोडा; पण माझ्या जन्मदात्या आईने आणि माझ्या भावा-बहिणींनी मला सावत्रपणाची वागणूक द्यायला सुरुवात केली. माझा तर फक्त चेहरा विद्रूप झाला होता. पण त्यांच्या मनाची विद्रुपता मला उठता बसता जाणवत होती. अशा कठीण प्रसंगी एक व्यक्ती माझ्या पाठीशी ठामपणे उभी राहिली. ॲसिड हल्ल्यानंतर मला कोणी जवळही घेत नव्हतं. पण त्या मला आपलेपणानं जवळ घेतात. माझा चेहरा आणि सौंदर्य यापलीकडे जाऊन त्या माझ्याशी वागतात. आज मी आहे, ती केवळ त्यांच्यामुळेच. त्यांनी मला मानसिक आधार दिला, माझ्यावर औषधोपचार केले म्हणून मी तुमच्याशी बोलू शकत आहे... माझ्यावर त्यांचे अनंत उपकार आहेत. माझा पुनर्जन्मच जणू झालाय त्यांच्यामुळं.''

हा संवाद आहे कमल वेढेकरचा... कमल जालना जिल्ह्यातील परतूर गावची मध्यम वयीन महिला. ती ज्यांच्याबद्दल बोलतेय त्या म्हणजे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजयाताई रहाटकर. पीडित आणि शोषित महिलांच्या मदतीला राज्य महिला आयोग कशा

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //


पद्धतीनं धावून जातो आणि महिलांना धीर देतो, याचं बोलकं उदाहरण म्हणजे कमल वेढेकर.

कमलच्या घरची परिस्थिती हलाखीचीच. कमल लहान असतानाच तिचे वडील गेले. परिस्थिती हलाखीची असल्याने तिनं सातवीतच शाळा सोडली. अशीच एकदा ती काही कामानिमित्त कांदिवलीला मावशीकडे गेली होती. तेव्हा तिचं वय होतं अवघं सतरा वर्षं. त्या दिवशी कमल मुंबईहून परतली. तो दिवस होता १३ डिसेंबर १९९८. त्या दिवसाचा उल्लेख जरी झाला तरी कमलच्या मनाला अजून वेदना होतात. त्या घटनेबद्दल खरं तर मला बोलतानाही कसंतरी होत होतं. मात्र, कमलनं ज्या धैर्यानं साऱ्या घटनेचा आणि त्यानंतरच्या प्रसंगांचा सामना केला, त्याच धीरानं मला त्या घटनेची माहिती दिली.

तिनं सांगितलेली घटना ऐकल्यानंतर अंगावर काटाच येतो. कमल सांगते, ''मी, आई, भाऊ आणि बहीण घरात रात्रीच्या सुमारास एकत्र जेवायला बसलो होतो. त्यावेळी कोणीतरी घराच्या दिशेनं टॉर्च मारत होतं. कोण टॉर्च मारतंय, ते पहायला मी घराबाहेर आले. तेवढ्यात दोन व्यक्ती मला भिंतीच्या आड लपलेल्या दिसल्या. त्यांनी तोंडावर फडकी बांधली होती. त्यामुळे त्यांचे चेहरे स्पष्ट दिसत नव्हते. ते झपकन पुढे आले आणि माझ्या तोंडावर ॲसिड फेकून निघून गेले.

मला तातडीने परतूरच्या रुग्णालयात नेण्यात आलं आणि नंतर जालन्यातील जिल्हा रुग्णालयात पुढील उपचारांसाठी हलविण्यात आलं; पण उपचारांमुळे फारसा फरक पडला नाही. माझे दोन्ही डोळे ॲसिड हल्ल्यात गेले होते. पोलिसांमध्ये आम्ही तक्रारही केली. पण दुर्दैवाने आमची तक्रार कोणीच गांभीर्यानं घेतली नाही, तपासही करण्यात आला नाही. बहुधा आणि त्यामुळेच ॲसिड फेकणाऱ्यांचा शोधही लागला नाही. आजही ते मोकाट फिरत आहेत आणि मी दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकले आहे.

अर्थात, ॲसिड हल्ल्यामुळे कोलमडून जाणाऱ्यातली मी नव्हते. हल्ल्यातून सावरल्यानंतर मी मुंबईला गेले. तिथं कुमुदबेन व्होरा संस्थेमध्ये काही वर्षे राहिले. तिथं हातमाग, शिलाई मशीन नि हॅण्डिक्राफ्ट यांचं शिक्षण घेतलं. तशा पद्धतीची मला जमतील तशी कामंही केली. पुढं मुंबईतच एमएस-सीआयटीचं प्रशिक्षणही घेतलं. पण नंतर मला मिळणारे पैसे आणि मी ज्यांच्याकडे पेइंग गेस्ट म्हणून राहायचे त्यांना हवे असलेले पैसे याचं आर्थिक गणित जमेनासं झालं. मी त्यावेळी फक्त चार हजार रुपये पेइंग गेस्ट म्हणून द्यायचे; पण त्यांना अधिक पैसे हवे होते. मी काही ठिकाणी प्रयत्न केले. पण मला कोणी पेइंग गेस्ट किंवा कॉट बेसिसवर जागा द्यायला तयार नव्हतं. अखेरीस २०१७ च्या मे महिन्यामध्ये जालन्यात परत आले. मी जोपर्यंत मुंबईत होते आणि स्वतःची स्वतः कमवत होते तोपर्यंत माझ्या घरच्यांना माझा काहीच त्रास वाटत नव्हता. पण मी घरी आले आणि त्यांनी माझा राग राग करायला सुरुवात केली.




माझ्या घरातील कोणीही तेव्हापासून माझ्याशी धड वागत नाही. मला जणू वाळीतच टाकले आहे. मला एका खोलीत बसवून ठेवतात. बाहेर येऊ नये, अशी व्यवस्था करतात. जन्मदाती आई, सख्खे भाऊ आणि बहीण हेदेखील माझ्याशी बोलत नाहीत. अनेकदा मला जेवायलाही देत नाहीत. कधी दिलंच जेवायला तर सारखं फुकटचं खायला पाहिजे, असं बोलून दाखवितात. गोळ्या आणि औषधेदेखील मी माझ्याकडे पैसे असतील तरच आणते. माझ्या घरच्यांना आणि नातेवाइकांना मी शापित वाटते. मी गावात परत आले आहे, हे जर गावकऱ्यांना कळले तर माझ्या बहिणीशी आणि भावाशी कोणी लग्न करणार नाही, म्हणून माझ्या घरचे मला घरातच कोंडून ठेवतात.

अशा कठीण प्रसंगामध्ये आणि खडतर परिस्थितीत मला एक बातमी समजली की, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजयाताई रहाटकर या ॲसिड हल्ल्यातील पीडित मुलींशी संवाद साधणार आहेत. ते समजल्यावर मी मुंबईला त्या कार्यक्रमाला गेले. अशा पद्धतीने ॲसिड हल्ल्यातील पीडित महिलांसाठी कार्यक्रम होतात ते तेव्हाच मला कळले. विजयाताईंनी मला खूप मदत केली. नंतरच्या तीन-चार कार्यक्रमांनाही बोलविले. ॲसिड हल्ल्यातील पीडित महिलांच्या रॅम्प वॉकच्या कार्यक्रमालाही मी उपस्थित होते. त्यानंतर माझ्याशी कायम संपर्कात होत्या. आजही आहेत.

खरं सांगायचं तर गेली वीस वर्षं मी कशी काढली आहे, ती माझी मला माहीत! मला कोणाची साथ नव्हती आणि कोणाचे पाठबळही नव्हते. मला जमेल तेवढी मी लढले. मला कुणाशी तरी खूप बोलावंसं वाटतं. मन मोकळं करावंसं वाटतं; पण माझ्याशी कोणीही बोलत नाही. सगळे मला टाळतात. पण विजयाताई मला कधीच टाळत नाही. ॲसिड हल्ला झाल्यानंतर माझ्या आईनं मला कधी जवळ घेतलं नाही; पण विजयाताईंना माझी लाज वाटत नाही. आज त्या माझ्यासाठी देवमाणूस ठरल्या आहेत. त्यांच्यामुळे मनाला उभारी मिळते. पुन्हा एकदा उभं राहून काहीतरी करायची इच्छा होते. त्यांचा सपोर्ट असेल, तर मी पुन्हा एकदा पूर्वीसारखीच स्वतःच्या पायावर ठामपणे उभी राहू शकेन, असा मला आत्मविशास आहे.''

''मध्यंतरी कमल खूप आजारी होती. थोडा जास्तच अशक्तपणा आला होता, पायदेखील खूप सुजलेले. हीमोग्लोबिन पाचपर्यंत खाली आलेलं. परिस्थिती ॲनिमिक होती,'' असं तिच्यावर उपचार करणारे औरंगाबादच्या सिग्मा हॉस्पिटलचे डॉ. उन्मेष टाकळकर सांगतात. ''ती बरेच दिवस उपाशी होती. जेवलीच नसावी बहुधा. त्यामुळे अशक्तपणा आला होता. हीमोग्लोबिनही खूप खाली आलं होतं. काही प्रमाणात मानसिक धक्काही बसला होता. त्यामुळंही परिस्थिती गंभीर होती. विजयाताई रहाटकर यांनी

तिला आमच्याकडे ॲडमिट केलं. जवळपास आठ दिवस ती आमच्याकडे होती. तिच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या. रक्त चढविण्यात

आलं. गोळ्या-औषधं देण्यात आली. वेळेवर जेवण घेईल, अशी व्यवस्था पाहिली. आठ दिवसांच्या उपचारांनंतर तिची परिस्थिती नॉर्मल झाली आणि मग तिला डिस्चार्ज देण्यात आला. आता फॉलोअपसाठी ती येत असते...''

''विजयाताई रहाटकर यांनी या संदर्भात खूप महत्त्वाची भूमिका बजाविली. खरंतर तिला ॲडमिट करायला थोडा उशीरच झाला होता; पण आणखी उशीर होऊन काहीतरी घडायच्या आत तिला हॉस्पिटलमध्ये दाखल केले ते बरे झाले. त्यामुळं तिच्यावर वेगाने उपचार करण्यात आले. आणखी काही दिवस वाया गेले असते तर परिस्थिती कदाचित बिकट झाली असती,'' असे डॉ. टाकळकर यांनी आवर्जून नमूद केले.

''राज्य महिला आयोग हा नेहमीच महिलांच्या पाठीशी ठामपणे उभा राहतो. कठीण प्रसंगांमध्ये आणि पीडित तसेच शोषित महिलांना आधार देण्याचे काम महिला आयोगाने कायमच केले आहे. तेच काम आम्ही या वेळीदेखील केले. आम्ही काहीही वेगळे केलेले नाही. कर्तव्यच पार पाडले आहे,'' असे विजयाताई यांनी अत्यंत नम्रपणे नमूद केले. ''तिचं आयुष्य वाचलं, हे महत्त्वाचं. आता तिला ब्रेल लिपी शिकविण्यासाठी महिला आयोग प्रयत्नशील आहे. त्यानंतर तिला एखादं विशेष प्रशिक्षण देऊन त्यानंतर तिला त्याच क्षेत्रातील नोकरी देण्याचे आमचे नियोजन आहे,'' असेही त्यांनी सांगितले.

कमलच्या निमित्ताने राज्य महिला आयोगाच्या वतीने ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला-मुलींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आणि उपक्रमांचा आढावा घेताना विजयाताई म्हणाल्या, ''ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला-मुलींसाठी राज्य महिला आयोगाने अनेक उपक्रम राबविले. मदतीचा हात पुढे केला. पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे ॲसिड हल्ला झालेल्यांना सर्जरीसाठी मदत. सर्जरीचा खर्च मोठा असतो. त्याचप्रमाणे सर्जरी झाल्यानंतरही अनेकदा मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. त्यामुळे अशा महिला-मुलींवर सरकारी किंवा खासगी हॉस्पिटलमध्ये नाममात्र दरांमध्ये उपचार व्हावेत यासाठी प्रयत्न केले. गरीब रुग्णांवर खासगी हॉस्पिटलमध्ये अत्यंत कमी पैशांमध्ये उपचार होतात. तीच सुविधा ॲसिड हल्ल्यातील पीडितांना मिळावी यासाठी प्रयत्न केले. मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता निधीतून त्यांना मदत होईल अशी व्यवस्था केली. आतापर्यंत या माध्यमातून तीन जणींच्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत. भविष्यात अशा पद्धतीने कोणावर शस्त्रक्रिया करण्याची वेळ येऊच नये. मात्र दुर्दैवाने अशी परिस्थिती ओढविली, तर महिला आयोग त्यांच्या पाठीशीदेखील ठामपणे उभा असेल.

ॲसिड हल्ला झालेल्यांकडे एक तर दयेच्या भावनेतून पाहण्यात येते किंवा त्यांना झिडकारण्यात येते. मात्र त्यांच्याकडे सर्वसामान्यांसारखेच पाहिले जावे, त्यांना माणूस म्हणून वागविण्यात यावे, यासाठी महिला आयोगाच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने 'सक्षमा' नावाचा उपक्रम राबविण्यात आला. त्याला विविध स्वयंसेवी संस्थांनीही मोठा हातभार लावला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुविद्य पत्नी सौ. अमृता यांचीही या कार्यक्रमाच्या आयोजनात खूप मदत झाली. ॲसिड हल्ल्यातील पीडित महिलांचा 'कॉन्फिडन्स वॉक' या निमित्ताने आयोजित करण्यात आला होता. त्याला अनेक मान्यवर, लोकप्रिय अभिनेते-अभिनेत्री तसेच विविध क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्ती उपस्थित होत्या. त्यात विवेक ओबेरॉय, जुही चावला, सोनाली बेंद्रे, वंदना लुथ्रा, मुंबईचे पोलिस आयुक्त, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त, ॲसिड हल्ला झालेल्या मुलींवर शस्त्रक्रिया करणारे आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त डॉ. अशोक गुप्ता आदी मान्यवरांचा समावेश होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांची पत्नी सौ. अमृता हेदेखील 'कॉन्फिडन्स वॉक'च्या या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. ॲसिड हल्ला झालेल्यांना स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने एक लाख रुपयांची मदत करण्यात आली. फक्त महिलांनाच नव्हे, तर तीन पुरुषांनाही महिला आयोगाच्या वतीने मदत करण्यात आली. हल्ला पुरुषावर झाला असला तरी त्याचा परिणाम घरावर आणि पर्यायाने घरातील महिलांवरही होतोच. त्यामुळेच हे धोरण अवलंबिण्यात आले, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने मुख्यमंत्री फडणवीस यांनी महत्त्वाची घोषणा केली. काही महिन्यांपूर्वीपर्यंत मनोधैर्य योजनेअंतर्गत ॲसिड हल्ल्यातील पीडितांना तीन लाख रुपयांची मदत मिळत होती. मुख्यमंत्री फडणवीस यांनी कार्यक्रमात ही मदत पाच लाख रुपयांपर्यंत वाढविण्याची घोषणा केली. त्यानंतर आता ही मदत दहा लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहितीही विजयाताई यांनी दिली. आवर्जून सांगावीशी वाटणारी गोष्ट म्हणजे विवेक ओबेरॉयने ज्या पीडित मुलीबरोबर 'कॉन्फिडन्स वॉक' केला होता, त्या मुलीला विवेकने घर भेट दिले आहे. आतापर्यंत ॲसिड हल्ल्यांतील तीन पीडितांचे लग्न झाले आहे, ही समाजाच्या दृष्टीने खूप महत्त्वाची गोष्ट आहे, असे विजयाताईंनी आवर्जून सांगितले. सांगलीतील 'पी.एन.जी.'च्या जाहिरातींच्या होर्डिंगवर ॲसिड हल्ल्यातील पीडित मुली त्यांच्या ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून झळकल्या. ही गोष्ट त्या मुलींना प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून आगळीवेगळी आहे, असेही त्या म्हणाल्या. सर्वांत शेवटची पण अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ॲसिड हल्ल्यातील पीडितांना नोकरी मिळावी आणि त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे, यासाठी आयोगाचे प्रयत्न सुरू असतात. आतापर्यंत अनेक मुलींना खासगी क्षेत्रातील कंपन्यांनी सामावून घेतले आहे. काहीजणींसाठी नोकरी शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सर्वांना नोकरी देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असेही विजयाताईंनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार राज्यातील तळागाळातील व्यक्तींसाठी विशेष प्रयत्नशील आहे. या राज्यात कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होऊ नये आणि कोणतीही व्यक्ती संधींपासून वंचित राहू नये, असाच सरकारचा प्रयत्न राहिलेला आहे. राज्यातील महिलांसंदर्भातील विविध कार्यक्रमांच्या आणि उपक्रमांच्या माध्यमातून राज्य महिला आयोग कायमच कार्यरत राहिलेला आहे. महिला आयोग आणि विजयाताई रहाटकर यांच्या पुढाकारामुळे कमल वेढेकरला जीवनदान मिळाले. भविष्यात तिचे आयुष्य पुन्हा एकदा रुळावर आल्यावाचून राहणार नाही. कमल वेढेकरसारख्या ॲसिड हल्ल्यातील पीडित महिलांसाठी राज्य महिला आयोग घेत असलेला पुढाकार नि आखत असलेल्या योजना निश्चितच कौतुकास्पद आहेत. आणि देवेंद्र फडणवीस सरकारच्या देदीप्यमान कारकिर्दीला साजेशा अशाच आहेत.

# महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक

महिला आपल्या संरक्षणासाठी, अन्याय होत असताना मदत मागण्यासाठी या ठिकाणी फोन करू शकतात.

**राज्य महिला आयोगाची ‘सुहिता’ हेल्पलाइन**
०२२-७४७७७२२४२४

**महिलांसाठी स्वतंत्र पोलिस हेल्पलाइन, पुणे**
०२०-२६०५०१९१ (www.punepolice.gov.in )

**पुणे नियंत्रण कक्ष**
०२०-२६१२६२९६

**पुणे गुन्हे शाखा कक्ष**
०२०-२६११२२२२,
२६२०८२९५

**पुणे महिला साह्य कक्ष**
०२०-२६२०८३४१

**हेल्पलाइन**
१८१

**पुणे सखी हेल्पलाइन**
०२०-२४४८४५३५

**स्त्री सन्मान हेल्पलाइन**
०२२-८८८८८०९३०६

**आय लव्ह मुंबई आणि सकाळ**
८८८८८०९३०६

**नवी दिल्ली हेल्पलाइन**
१८२



# अन्याय सहन करू नका, कायद्याची मदत घ्या

- महिला आयोग सदैव आपल्या पाठीशी आहे.
- कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून प्रतिबंध/ मनाई/ निवारण कायदा, २०१३ नुसार कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता आहे.
- कौटुंबिक हिंसाचार कायदा,२००५ अन्वये महिलांना संरक्षण, निवारा, मुलांचा हक्क/ नुकसान भरपाई/पोटगी या कायद्यान्वये मागू शकतात.
- गर्भधारणापूव व प्रसूतीपूर्व निदान तंत्र अधिनियम १९९४ या कायद्याने लिंग निवडीबाबत प्रतिबंध करण्यात आला आहे.
- सायबर क्राईम अधिनियम २०१५ अन्वये अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध करणे, महिती काढणे कायद्याने गुन्हा आहे.
- अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अन्वये महिलांची तस्करी करणे कायद्याने गुन्हा आहे.
- लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ (**POCSO**) अन्वये अल्पवयीन बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यात आला आहे.

## साद-प्रतिसाद

प्रिय वाचक,
साद अंकाविषयी आपल्या प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहत आहोत. त्याच बरोबर आपल्या समस्यांविषयी मार्गदर्शन हवे असल्यास आपण 'साद'शी संपर्क साधू शकता. आपल्या समस्या खालील मेलवर लिहून पाठवा.
saad.mscw@gmail.com

रौप्य महोत्सवी वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई**
गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८
mscwmahilaayog@gmail.com

# पतीच्या पगाराची माहिती मिळवणे हा पत्नीचा हक्कच

## मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचा निकाल

साद प्रतिनिधी

पतीच्या पगाराबद्दलची संपूर्ण माहिती मिळविणे, हा पत्नीचा अधिकार असल्याचे मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने म्हटले आहे. सुनीता जैन नावाच्या महिलेच्या याचिकेवर सुनावणी करताना मध्य प्रदेश उच्च न्यायालयातील न्या. एस. के सेठ आणि नंदिता दुबे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

पतीकडून देखभाल खर्च वाढवून मिळावा, यासाठी सुनीताने न्यायालयात धाव घेतली होती. सुनीताचा पती बीएसएनएल कंपनीमध्ये वरिष्ठ अधिकारी पदावर कार्यरत आहे. सुनीता व तिच्या पतीचा घटस्फोट झाला असून, ते दोघेही वेगळे राहतात सुनीताला तिचा पती पवन कुमार यांच्याकडून महिन्याला सात हजार रुपये पोटगी मिळत होती. विभक्त पती खूप जास्त पैसे कमावतो, पण सुनीताला कमी पैसे देतो, अशी तक्रार सुनीताच्या वकिलांनी न्यायालयात केली. पतीचे पगारपत्रक पाहायला मिळण्याची सुनीताची याचिका आधी सुनावणी न्यायालयाने फेटाळली होती. त्यानंतर सुनीताने माहिती अधिकारातून पती पवनचे उत्पन्नाचे तपशील मिळविले. सुनीताच्या मागणीनंतर हे प्रकरण केंद्रीय माहिती आयोगाकडे गेले. त्यानंतर माहिती आयोगाने २७ जुलै २००७मध्ये बीएसएनएलला सुनीता जैन यांना पवन यांच्या पगाराबद्दल माहिती देण्याचे निर्देश दिले. पवन जैनने या निर्देशांना उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सुनीता यांनी त्यांचे पती आणि बीएसएलएल दोघांच्या विरुद्ध दोन वेगळ्या याचिका दाखल केल्या होत्या. दरम्यान, सुनीता यांच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिला. 'पत्नी म्हणजे कोणी तिसरी व्यक्ती नाही, त्यामुळे तिला या संदर्भातील माहिती देण्यापासून नकार देता येणार नाही. पत्नीला तिच्या पतीचा पगार जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे, ' असे न्यायालयाने सांगितले आणि सुनीता जैन यांच्या पतीला त्यांना लवकरात लवकर पगारपत्रक देण्याचे आदेश दिले आहेत.

**(सौजन्य - लोकमत/सामना)**

# प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांना स्थगिती द्या

## महिला आयोगाच्या सदस्य देवयानी ठाकरे यांची मागणी

साद प्रतिनिधी

प्राथमिक शिक्षकांच्या बदली धोरणामुळे महिला शिक्षकांवर अन्याय होत आहे. या ऑनलाइन बदली प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता आहे. त्यामुळे या यंत्रणेत सुधारणा करावी आणि या बदली धोरणास त्वरित स्थगिती द्यावी, अशी मागणी राज्य महिला आयोगाच्या सदस्य देवयानी ठाकरे यांनी आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांच्याकडे केली आहे.

प्राथमिक शिक्षकांची बदली प्रक्रिया राज्याच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने राबविण्यात येते. यात महिलांच्या समस्या, शारीरिक अथवा कौटुंबिक स्थिती लक्षात न घेता मनमानी पद्धतीने बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे महिला शिक्षकांनी देवयानी ठाकरे यांची भेट घेऊन आपल्या समस्या मांडल्या. त्यानंतर ठाकरे यांनी महिला आयोगाच्या अध्यक्ष रहाटकर यांना निवेदन दिले आहे.

'या ऑनलाइन बदली प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता आहे. सेवेत असणाऱ्या पती-पत्नींबाबत एकत्रीकरणाचे धोरण न राबविल्याने कुटुंबापासून किमान ५० किलोमीटरहून अधिक अंतरावर नोकरीचे ठिकाण असल्याचे प्रकार घडले आहेत. त्यातही महिलांची नियुक्ती दुर्गम आणि दूरस्थ भागात झाल्यास त्यांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागेल. कनिष्ठ शिक्षिकांच्या विस्थापनामुळे बालसंगोपन, स्तनदा मातां यांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. प्राथमिक शिक्षण क्षेत्रात महिलांचे व्यावसायिक योगदान अत्यंत प्रामाणिक आहे, तथापि बदल्यांच्या नव्या धोरणामुळे कौटुंबिक विस्थापन झाल्यास मानसिक तणावामुळे या शिक्षिकांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होऊन एकूणच शिक्षण व्यवस्थेवर दुष्परिणाम जाणवतील,' अशी भीती निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

### नवे धोरण आखा

प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांबाबतच्या धोरणाला स्थगिती देण्यात यावी, अशी विनंती राज्य महिला आयोगाच्या वतीने मुख्यमंत्री आणि ग्रामविकास मंत्र्यांना करण्यात आली आहे. तसेच, महिला शिक्षकांच्या समस्या विचारात घेऊन नवे धोरण आखण्याचीही मागणी आयोगाने केली आहे.

# मुंबईत महिलांसाठी पॅनिक बटण

साद प्रतिनिधी

उन्नाव आणि कठुआ येथील घटनांच्या पार्श्वभूमीवर मुंबईत पोलिसांनी महिलांच्या सुरक्षिततेसाठी विशेष प्रकल्प हाती घेतला आहे. ज्या ठिकाणी महिलांविषयक गुन्ह्यांचे प्रमाण जास्त आहे, अशांना हॉट स्पॉट असे नाव देण्यात आले असून, तेथे पॅनिक बटण उपलब्ध करून देण्यात येणार असून, ड्रोनच्या मदतीने लक्ष ठेवण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे २५२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

या प्रकल्पाबाबत मुंबई पोलिसांतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले, ही यंत्रणा कार्यान्वित करण्याआधी आम्ही शहरातील गुन्हेगारी हॉट स्पॉटची भौगोलिक स्थाननिश्चिती (जिओग्राफिक इन्फर्मेशन सिस्टीम) करणार आहोत. ज्या ठिकाणी विनयभंग, बलात्कार, छेडछाड किंवा तत्सम गुन्ह्यांचे प्रमाण अधिक असेल, तेथे पॅनिक बटण बसवली जातील. या पॅनिक बटणच्या सुरक्षिततेसाठी पॅनोरमिक कॅमेरायुक्त सीसीटीव्ही, फेस रेकग्निशनसारख्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानयुक्त सॉफ्टवेअर, व्हिडिओ अनालिटिक्सची उपकरणे आणि तत्क्षणी माहिती देणारी यंत्रणा बसवली जाईल.

१६ डिसेंबर २००२ रोजी दिल्लीत घडलेल्या निर्भया प्रकरणानंतर केंद्र सरकारने निर्भया निधी स्थापन केला असून, त्या निधीतून यंत्रणा उभारणीचा खर्च करण्यात येणार आहे. मार्च महिन्यात केंद्र सरकारने निर्भया निधीतून आठ शहरांना सुरक्षित बनविण्यासाठी २९१९ कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यातूनच मुंबईसाठी २५२ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प प्रस्तावित आहे. या निधीचा वापराचा प्रस्ताव पाठविणारे मुंबई पहिले शहर आहे, अशी माहिती गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलिस महासंचालक के. एम. एम. प्रसन्ना यांनी दिली.


'इतर शहरांत असे प्रकल्प पोलिस आणि नागरी प्रशासन यांच्या सहकार्यातून राबविण्यात येणार आहेत. मुंबईत मात्र संपूर्णपणे मुंबई पोलिसच हा प्रकल्प राबविणार आहेत,' असेही पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

'पोलिसांना टेहळणीची उपकरणे, सुरक्षाविषयक उपकरणे, गुन्हेगारांचे जीआयएस मॅपिंग, तसेच इतर अत्याधुनिक उपकरणे खरेदीसाठी तीन वर्षांत १९९.४५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत,' असे गृह विभागातील एका अधिकाऱ्याने सांगितले.

### कशी असतील पॅनिक बटण?

- मुंबई शहराच्या सर्व भागात पॅनिक बटण बसविणार
- बटण दाबताच पोलिस नियंत्रण कक्षातील गजर वाजणार
- लगेच जवळच्या पोलिस ठाण्यातील शीघ्र कृती दल कामाला लागेल
- प्रतिसाद वाहन आणि दुचाकीवरून पोलिस येऊन पीडितेला तत्काळ मदत करतील

# पोलिसांच्या सुरक्षा यंत्रणेत ड्रोनचाही समावेश




### सायबर अत्याचारांवरही लक्ष

अलीकडे समाजमाध्यमांद्वारे (सोशल मीडिया) महिलांचे शोषण, फसवणूक, अत्याचार होण्याच्या घटना वाढल्या आहेत. त्यांना पायबंद घालण्यासाठीही विशेष यंत्रणा पोलिस दल उभारणार आहे. त्यात एका ट्रक मी सोल्युशनचा समावेश आहे. तसेच, ट्रक मी मोबाइल अप्लिकेशन आणि क्यूआर कोडही विकसित करण्यात येणार आहेत.

**(सौजन्य : इंडियन एक्स्प्रेस)**

# श्रीमंत मुले असूनही वृद्ध आईची आबाळ...




**वृद्ध आई-वडिलांचा सांभाळ, शहरांमधील दिवसेंदिवस आक्रसत जाणारी घरे आणि माणसांचे स्वभाव यामुळे सुमनआजींचे ओझे त्यांच्या मुलांना वाटू लागले मात्र आयोगाच्या प्रर्यत्नांमुळे मुलांना आपली चूक समजली.**

## धनंजय बिजले

श्रीधरराव (मूळ नाव बदलले आहे) आणि सविता (मूळ नाव बदलले आहे) साधारण पन्नाशीतील जोडपे. त्यांच्या दोन्ही मुलांचे शिक्षण पूर्ण झालेले. थोरला मुलगा मार्गी लागलेला... तो आता लग्नाला आलेला. घरात श्रीधररावांच्या वयोवृद्ध आईदेखील राहत. या सुमनआजींचे वय आता जवळपास ८५ वर्षे नक्कीच झालेले असेल. वयोमानानुसार त्या फारसे घराबाहेर पडत नसत. बऱ्याचदा आजारीच असत. सध्या तर त्या बेडवरच होत्या. मुंबईसारख्या मोठ्या शहरात जुन्या फ्लॅटमध्ये राहत असल्याने घर फार काही प्रशस्त नव्हतेच. पण तरीही एका घरात ही पाच माणसे आनंदाने राहत होती. श्रीधरराव जमेल तशी आपल्या आईची काळजी घेत संसाराचा गाडा हाकत होते.

श्रीधररावांना आणखी दोन मोठे भाऊ होते. तिघांत श्रीधरराव सर्वांत धाकटे. या दोन्ही मोठ्या भावांची सांपत्तिक स्थिती श्रीधररावांपेक्षा फारच चांगली होती. थोरला भाऊ सरकारी बँकेतून मॅनेजर म्हणून निवृत्त झालेला, तर दुसरा भाऊ असाच सरकारी नोकरीतून मोठ्या पदावरून सेवानिवृत्त होण्याच्या वाटेवर होता. यातील एकाचा तर प्रशस्त बंगला होता. श्रीधररावांची तुलना करता हे दोन्ही मोठे भाऊ तसे फारच श्रीमंत होते, यात काही वादच नव्हता. पण या सर्वांची आई म्हणजे सुमनआजी मात्र नेहमी श्रीधररावांकडेच राहत असे. अर्थात, त्याबद्दल श्रीधररावांची कधी फारशी तक्रार नव्हती. कारण, सुरवातीपासून आई त्यांच्याकडे रहायची. त्यांची लहान मुले सुमनआजींनीच वाढविली. या नातवांनाही आजीचा लळा होताच. तेदेखील त्यांची काळजी घ्यायचे. मात्र अलीकडे श्रीधररावांची फारच ओढाताण होत असे. मुलांच्या शिक्षणाचा खर्च, आईच्या औषधांचा खर्च तुटपुंजा पगारात भागवताना त्यांना नाकेनऊ यायचे. मात्र त्याची त्यांनी फारशी कोणापुढे कधी वाच्यता केली नाही. आतापर्यंत हे सारे करत त्यांनी मुलांना शिकवले होते. थोरला तर आता नुकताच नोकरीलाही लागला




होता. त्याला फार पगार नव्हता, पण तो मार्गी लागल्याचे समाधान त्यांना होतेच. मात्र आता त्यांना वेगळीच अडचण वाटू लागली होती. ती म्हणजे थोरला मुलगा आता लग्नाला आलेला. त्याला मुली पहायला सुरू करण्याचा त्यांचा बेत होता. त्यातच वयोवृद्ध आई बेडवरच असायची. त्यामुळे घरात नेहमी जागेची अडचण भासायची. अशातच ते दिवस काढत होते.

श्रीधरराव आणि सविताताई यांच्यात यावर नेहमी चर्चा व्हायची. यावर काय मार्ग काढायचा, हेच त्यांना कळत नव्हते. खरं पाहिले तर त्यांच्या दोन्ही थोरल्या भावांकडे आई अधूनमधून रहायला गेली तर अनेक प्रश्न चुटकीसरशी सुटणार होते. कारण, या दोन्ही भावांची घरे मोठी होती, त्यांना पैशांचा फारसा प्रश्न नव्हता. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे या दोन्ही थोरल्या भावांच्या मुला-मुलींची आता लग्नेदेखील झालेली होती. त्यातील सर्वांत थोरल्या भावाचा मुलगा व सून आता परदेशात स्थायिक झाले होते. त्यामुळे त्यांच्या प्रशस्त बंगल्यात ते व त्यांची पत्नी दोघेच राहत होते. श्रीधररावांचे दोन्ही थोरले बंधू अधूनमधून त्यांच्या घरी येत. सहसा सणावाराला नक्की येत व आईला, त्यांना भेटून जात. त्यांच्यात तसे फारसे वाद नव्हते. पण सर्व जण मोठे झाल्याने तसे फारसे रोजचे संबंधही नव्हते.

आपल्या सासूने अधूनमधून दीरांकडे रहायला जावे, असे सविताताईंना अधूनमधून वाटायचे. पण सासूबाईंना कसे सांगणार, असा यक्षप्रश्न त्यांच्या मनात सतत यायचा. शिवाय दीर व जाऊबाईंना विचारण्याची त्यांची बिशाद नव्हती. एक तर त्या घरातील सर्वांत लहान सून. त्यात दोन्ही थोरल्या जाऊबाई श्रीमंत. त्यामुळे नाही म्हटले तरी त्यांच्यात आर्थिक स्तराची एक अदृश्य भिंत कायमच उभी राहिलेली होती. तुम्ही आपल्या मोठ्या भावांशी यावर काय बोलत नाही, असे सविताताई श्रीधररावांना अधूनमधून म्हणत. पण श्रीधररावदेखील मितभाषी. त्यात दोन्ही भावांचा स्वभाव थोडसा कडक किंवा तुसडा म्हणावा असा. त्यामुळे तेदेखील विचारायला कचरत असत. पण तरीही एक-दोनदा त्यांनी मनाचा हिय्या करून आपल्या मोठ्या भावांपुढे आडून आडून हा विषय काढला. पैशांची, जागेची अडचण सांगितली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. दोन्ही भावांनी या कानाने ऐकून त्या कानाने सोडून दिले. त्यावर काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. त्यामुळे श्रीधररावांची आणखी बिकट स्थिती झाली. बायकोने हा विषय काढला की ते तिलाच शांत बसवत. एकंदरच सुमनआजींना सांभाळण्याबाबत त्यांच्या मनात द्विधा मनःस्थिती निर्माण झालेली होती. खरे तर आईला सांभाळण्याबाबत त्यांची ना नव्हती. कारण पहिल्यापासून त्या त्यांच्याकडेच तर राहत होत्या. पण सध्याच्या परिस्थितमुळे ते थोडे त्रासून गेले होते.

मात्र याची वाच्यता या उभयतांनी कधीही कोणापुढे केली नाही. श्रीधरराव व सविताताई घरात हा विषय कधीही काढत नसत. आपल्या मुलांपुढेही हे दोघे याबाबत चकार शब्द काढत नसत. बाहेर असताना किंवा एकान्तात असताना मात्र ते यावर काय करता येईल, यावर बोलत. एक दिवस असेच विचार करत करत श्रीधरराव व सविताताई राज्य महिला आयोगाच्या कार्यालयात पोहोचले. आपल्या आईला सांभाळण्याची जबाबदारी तिन्ही मुलांची नाही का, असा सवालच त्यांनी केला. तिन्ही मुलांनी आईचा सांभाळ केला पाहिजे, असा काही कायदा नाही का, असेही त्यांनी विचारले. महिला आयोगातील अधिकारी, कर्मचारी त्यांच्या या प्रश्नाने खरे तर आवाक्च झाले. श्रीधरराव म्हणाले, आम्ही तीन भाऊ आहोत. मग तिघांनीही चार-चार महिने आलटून पालटून आईचा सांभाळ करण्यास काय हरकत आहे. किंबहुना असे करायला हवे यासाठी तुम्ही काही करू शकत नाहीत का, असेही त्यांनी विचारले. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर त्यांनी तशी मागणी करणारा एक अर्जच लिहून दिला आणि तुम्ही आमच्या भावांकडे याबाबत विचारणा करून यातून मार्ग काढावा, अशी मागणी केली. खरं तर त्यांना जे जमत नव्हते ते भावांना विचारण्याचे काम आयोगाने करावे, अशी त्यांची इच्छा होती.

महिला आयोगाच्या अधिकार्यांनी ही बाब अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांच्या कानावर घातली. त्यादेखील हे ऐकून विचारात पडल्या. तीन तीन कर्तृत्ववान मुले असून, वृद्ध आईला सांभाळायचे कोणी, असा प्रश्न निर्माण होतो, हे पाहून त्या सुरवातीला अचंबित झाल्या. या समोर आलेल्या नव्या प्रकरणाने शहरातील कौटुंबिक समस्यांचा एक वेगळाच पदर समोर आला होता. त्यांनी यात लक्ष घालण्याचे ठरविले आणि सहकार्यांशी चर्चा केली. या प्रकरणात मार्ग काढणे गरजेचे आहे, असे त्यांना वाटले. कारण, शक्य तितक्या लवकर यातून मार्ग काढला नाही तर पुढे वृद्ध आजींची सेसेहोलपट होण्याची शक्यता होती. शिवाय तीन-तीन मुले असताना आजींना हालअपेष्टा सोसाव्या लागण्याची शक्यता होती. मानवातावादी दृष्टीतून संवेदनशीलपणे हा प्रश्न सोडवावा लागणार होता. महत्त्वाचे म्हणजे या समस्येवर तोडगा काढण्यासाठी श्रीधररावांच्या वृद्ध आई व त्यांचा मोठ्या भावांना बोलावून समोरासमोर रुजवात घालावी लागणार होती. पण हे करणे गरजेचे होतेच.

त्याचप्रमाणे श्रीधरराव खरे बोलत आहेत का, त्यांची वृद्ध आई खरंच बेडवर झोपून असते का, याची शहानिशा करणेही तितकेच गरजेचे होते. आयोगाचे समुपदेशक कधीही केवळ तक्रारदाराच्या अर्जावर पूर्ण विश्वास ठेवून पावले टाकत नाहीत. कारण, अनेकदा तक्रारदार खोटी माहिती देत असतो किंवा दुसरी बाजू सांगतच नसतो. अनेक प्रकरणात असे याआधी घडलेले होते. त्यामुळे या प्रकरणात समुपदेशकांनी प्रथम श्रीधरराव व त्यांच्या पत्नीला दोन दिवसांनी कार्यालयात बोलाविले. ते आयोगाच्या कार्यालयात असतानाच त्यांनी त्यांच्या परोक्ष घरी सुमनआजींना फोन लावला. आजी बोलू शकतात का, परत मुलाने तक्रार केली आहे हे ऐकून त्यांना काय वाटेल, या विषयावर त्या बोलतील का, अशा एक ना अनेक शंका व भीती समुपदेशकांना होतीच. पण तरीही त्यांनी हिय्या करून फोन लावला आणि त्यांना त्यांच्या मुलांच्या अर्जाची भीत भीत माहिती दिली. तिन्ही भावांनी तुम्हाला सांभाळण्याची जबाबदारी समानपणे उचलावी, असे श्रीधररावांचे मत आहे, असे समुपदेशकांनी सांगितले. त्यावर चर्चा करण्यासाठी तुम्ही आयोगाच्या कार्यालयात येणार का, असेही त्यांना विचारले. आजी काय उत्तर देणार याकडे समुपदेशकांचे लक्ष होते. मात्र समुनआजींच्या उत्तराने तेही चकित झाले. त्यांना असे उत्तर तेही एका क्षणात अपेक्षित नव्हते.

समोरून फोनवर सुमनआजी म्हणाल्या, ''अरे वा, माझ्या मुलानेच तुमच्याकडे तक्रार केली आहे म्हटल्यावर मी येईन की, मलाही यायचेच आहे. आज मी नव्वदीच्या घरात आहे. अजून किती दिवस जगणार आहे. तेव्हा माझ्याबाबत माझ्या गुणी मुलांना काय वाटते, हे मलाही जाणून घ्यायचेच आहे.'' या वयातही सुमनआजींचा आवाज बपैकी स्पष्ट होता. त्या फारशा हिंडत फिरत नसल्या, वयोमानानुसार त्यांची दृष्टी थोडी कमी झालेली असली तरी बुद्धी व स्मरणशक्ती मात्र चांगलीच तल्लख होती. आजींना हा विषय आम्ही सांगितला असून, त्या यावर चर्चा करण्यासाठी आयोगाच्या कार्यालयात येण्यास तयार आहेत, हे समुपदेशकांनी बाहेर बसलेल्या श्रीधररावांना सांगितले. हे ऐकून त्यांनाही धक्काच बसला. पण थोडे बरेही वाटले. कारण, आपली अडचण आता तरी भावांच्या लक्षात येईल, यातून काही तरी तोडगा निघेल असे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर आयोगाने श्रीधररावांच्या दोन्ही थोरल्या भावांना नोटीस पाठवून कार्यालयात येण्यास सांगितले. त्यांना ही नोटीस वाचून धक्काच बसला. पण त्यांनी या नोटिशीला

अजिबात दाद दिली नाही. त्यांना आयोगाने पुन्हा दुसरी नोटीस पाठविली. पण त्यालही साधे उत्तर देण्याची तसदी त्यांनी घेतली नाही. मग मात्र आयोगाने बैठकीची तारीख ठरविली व त्यांना समन्स काढून बोलावून घेतले. आता मात्र हे दोन्ही भाऊ ताळ्यावर आले व त्यांनी येण्याचे मान्य करून तसे कळवले.

झाले... बैठकीचा दिवस व वेळ ठरली. दुपारी अकराला ठरलेल्या वेळी आयोगाच्या कार्यालयात श्रीधरराव, सविताव‍हिनी आल्या. त्यांच्या सोबत सुमनआजीही आल्या. त्यांना तसे ठीकसे चालता येत नव्हते. नुकत्याच त्या आजारातून उठल्या होत्या. पण वॉकरच्या साहाय्याने त्या लिफ्टचा आधार घेत आल्या. श्रीधररावांचे दोन्ही थोरले बंधू व वहिनीदेखील आल्या. बैठकीचे चित्र भलतेच विलक्षण होते. एका खुर्चीत ८५ वर्षांच्या सुमनआजी बसल्या होत्या, तर समोर त्यांची तीन मुले व तीन सुना असे सहा लोक बसले होते. आजींना कोणी सांभाळायचे, की प्रत्येकाने चार चार महिने सांभाळायचे, यावर आज चर्चा होऊन तोडगा निघणार होता. किमान प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न तरी होणार होता.

श्रीधररावांनी आपली समस्या थोडक्यात मांडली. ते म्हणाले, ''खरं तर आपल्याच घरातील हा प्रश्न असा बाहेर चारचौघांत मांडणे मला प्रशस्त वाटत नाही. पण सध्या आईला सांभाळताना माझी चांगलीच अडचण होत आहे. माझ्या घरात जागाही अपुरी आहे, शिवाय तिच्या औषधपाण्याचा खर्चही मला पहावा लागतो. एवढे करूनही आई आम्हालाच फाडफाड बोलते. पण वयाचा मान राखून आम्ही नवरा-बायको तिला कधीही उलट शब्द बोलत नाही. माझे दोन्ही थोरले भाऊ, वहिनी, त्यांची मुले-मुली माझ्याकडे अधूनमधून येतात. त्यांची परिस्थिती आमच्यापेक्षा कितीतरी चांगली आहे. आमची अडचण त्यांनाही दिसते. पण त्यावर ते कधीही चकार शब्द काढत नाहीत. एखाद्या पाहुण्याप्रमाणे घरी येतात. आईशी गप्पा मारतात आणि निघून जातात. गेली अनेक वर्षे हा सिलसिला सुरूच आहे. पण आता माझ्या मुलाचे लग्न करायची वेळ झाली आहे. उद्या मुलीकडचे लोक घर पहायला येणार. त्यावेळी जागेची अडचण त्यांना सहज जाणवणार. माझ्यापेक्षा माझे थोरले बंधू अधिक कर्तबगार आहेत, श्रीमंत आहेत. पण त्यांनाही हे कळू नये याचे मला विशेष वाटते आणि कधी कधी याचा रागही येतो. पण ते कधीही मला मदत करण्याचे साधे नावही घेत नाहीत. आई काय माझी एकट्याची आहे का? त्यांचीही आहेच की. त्यांना कधी आईविषयी प्रेम वाटत नाही का, तिला सांभाळण्याची जबाबदारी आपलीही आहे असे त्यांना कधी वाटत नाही का?, असे माझ्या मनात अनेकदा येते. पण मी आईवरील प्रेमापोटी शांत राहतो. आतल्या आत माझी घुसमट होते. पण ती कधी कोणाला सांगण्याच्या नादी लागत नाही.''

श्रीधरराव हे सारे सांगत असताना त्यांचे थोरले भाऊ हे सारे ऐकत होते. मात्र त्यांचे चेहरे निर्विकारच होते. ते यावर एकही शब्द बोलले नाहीत. हे पाहून त्या वृद्ध माऊलीला अचंबाच वाटला. सुम नआजी तशा करारी, स्वाभिमानी. मात्र आज त्या मात्र हळव्या झाल्या. त्यांच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा वाहू लागल्या. आपली दोन्ही थोरली मुले गप्प आहेत, हे पाहून आता त्याच बोलू लागल्या.

समुपदेशकांना सुमनआजी म्हणाल्या, ''बघा ना, माझ्यावर या वयात काय वेळ आली आहे. तीन तीन मुले असताना मला सांभाळणार कोण, यावर चर्चा करायची वेळ आली. इतके चांगले-वाईट दिवस पाहिले, आता एवढेच पहायचे राहिले होते. पण एका परीने हे बरेच झाले. मला जगाचा रिवाज कळला.'' त्या सांगू लागल्या, ''तिन्ही मुले शाळेत शिकत असतानाच माझ्या पतीचे निधन झाले. सारं आभाळच फाटलं होतं त्यावेळी जणू. मात्र मी धीरानं घेतले. त्याशिवाय काही पर्यायही नव्हता. भरपूर काबाडकष्ट केले. पोटच्या या तिन्ही मुलांना लहानाचे मोठे केले, चांगले शिकवले, त्यांना चांगल्या नोकऱ्या लागल्या. तिन्ही मुले स्थिरावली. त्यांची लग्ने झाली. जुने दिवस सरले. घरात आनंद ओसंडून वाहू लागला. लग्नानंतर मुले वेगळी राहू लागली. एका परीने ते गरजेचेही होतेच. पण मी कोणाच्या दारात कधी गेले नाही. मी श्रीधरकडेच राहिले. यात माझा काय दोष.. आज मात्र ही परिस्थिती मला पहावत नाही. मुलाच्या आधाराशिवाय या वयात मी जगूही शकत नाही. असे किती दिवस मी आता जगणार आहे. पण आणखी काय काय पहावे लागणार आहे आयुष्यात कोणास ठाऊक?...मला तुम्ही कोणी सांभाळू नका, सरळ कोणत्या तरी वृद्धाश्रमात सोडा,'' असे त्या रागाने म्हणाल्या. सुमनआजीचे बोलणे ऐकून सारे सुन्न झाले. तिन्ही मले, सुनांच्या डोळ्यांतूनही अश्रू वाहू लागले. जो सर्वात रागीट, करारी थोरला मुलगा होता तो तर रडूच लागला. त्याने आईच्या पायावरच डोके टेकवले. धाकटा श्रीधर गरीब असला तरीही मनाने आमच्यापेक्षा श्रीमंत आहे, असे तो म्हणाला. दोन्ही सुनांची अवस्था तर मेल्याहून मेल्यासारखीच झाली होती. त्यांच्या माना शरमेने खाली गेल्या होत्या. चूक कबूल करण्याचा मोठेपणा त्यांच्यात नव्हताच मुळी. पण सासूबाईच्या बोलण्याने त्या चांगल्याच वरमल्या होत्या.

आम्ही कधीही श्रीधरला मदत केली नाही की त्याची अडचण आपली आहे असे मानले नाही. इतकेच काय आईला सांभाळण्याची जबाबदारी आमचीही आहे, याचा विचारही केला नाही. मनात विचार आला तरी आम्ही तो ओठावर आणला नाही. श्रीधरने विषय काढला तरी आम्ही काणाडोळा केला, असे दुसऱ्या भावाने व त्यांच्या बायकोने कबूल केले. आता आम्ही आईचा सांभाळ करू, तिच्या औषधपाण्याचा खर्च करू, असे ते सांगू लागले. पण सुमनआजींचा स्वभाव आजही तसाच करारी होता. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, ''श्रीधरला काय वाटायचे ते वाटू दे. पण मी त्याच्याकडेच राहणार. आता तुमच्याकडे येणार नाही.'' हे ऐकून दोन्ही थोरली मुले गप्पगारच झाली. आईला घरी येण्याची विनवणी करू लागले. अखेर हो-ना करत सुमनआजींनी होकार दिला. सुमनआजींना आर्थिक अडचण तशी नव्हती. पण सध्याची सामाजिक परिस्थिती कोणत्या थराला गेली आहे, त्यातून कशा समस्या निर्माण होत आहेत, वृद्ध लोकांना याचा कसा त्रास होत आहे, हे यातून प्रकर्षाने पुढे आले. खरे तर महिला आयोगाचा हा विषय नाही. पण मानवतेच्या बाजूने विचार करून अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांनी या कौटुंबिक समस्येत लक्ष घातले आणि तो सोडवण्याचा प्रयत्न केला. महिला आयोगाच्या प्रयत्नांमुळे मुलांना आपल्या कर्तव्याची जाणीव झाली.

# दूरदृष्टी लाभलेली पुण्याची
# टेनिस क्वीन

**टेनिसला प्रारंभ होण्यापूर्वीच दृष्टी गमावण्याचा धोका तिच्याबाबत निर्माण झाला होता त्यावर मात करत म ल्लिका आज भारतातील चौदा वर्षांखालील मुलींच्या क्रम वारीत अव्वलस्थानी विराजम ान झाली आणि सानियाची वारसदार असल्याचे संकेत देत पुण्याची 'दूरदृष्टी लाभलेली टेनिस क्वीन' बनली आहे.**


## अमित मधुकर डोंगरे
amitdongre10@gmail.com


टेनिस सम्राज्ञी सानिया मिर्झाकडून प्रेरणा घेत आज भारतात शेकडो मुली टेनिसकडे वळत आहेत, नावारूपालाही येत आहेत. पुण्याची मल्लिका मराठे ही पण अशाच काही खेळाडूंपैकी एक खेळाडू. टेनिसला प्रारंभ होण्यापूर्वीच दृष्टी गमावण्याचा धोका तिच्याबाबत निर्माण झाला होता त्यावर मात करत मल्लिका आज भारतातील चौदा वर्षांखालील मुलींच्या क्रमवारीत अव्वलस्थानी विराजमान झाली आणि सानियाची वारसदार असल्याचे संकेत देत पुण्याची 'दूरदृष्टी लाभलेली टेनिस क्वीन' बनली आहे.

मल्लिकाला वयाच्या चौथ्या वर्षी डाव्या डोळ्याला 'ॲम्ब्लीओपीया' हा विकार झाल्याचे निष्पन्न झाले आणि तिच्या पालकांसमोर चिंतेचा अंधःकार पसरला. इतक्या लहान वयात दृष्टी गेली तर काय असा भला मोठा प्रश्न निर्माण झाला होता, नेमके त्याचवेळी एका नेत्रतज्ज्ञाने अफाट मेहनत घेत हा दृष्टिदोष दूर केला आणि तिच्या आयुष्यातील अंधःकार दूर करीत तिच्या कारकिर्दीचा हमरस्ता प्रकाशमान केला. मल्लिकाने टेनिसचे धडे गिरवायला ज्या वयात प्रारंभ केला त्या वयात बहुतेक मुली आपल्या पालकांकडे आइस्क्रीमचा हट्ट करतात. आज मल्लिका इयत्ता आठवीमध्ये सिम्बायोसिस शाळेत शिकत आहे आणि शाळेच्या मुख्याध्यापिका वीणा मॅडम यांचा तिला भक्कम पाठिंबा आहे.

क्लब, शालेय, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्पर्धा अशी यशाची एकेक शिखरे पादाक्रांत करत मल्लिका आज पुण्याची टेनिस क्वीन बनली आहे. आता जरी केवळ तेरा वर्षांची असली तरी तिने अठरा वर्षांखालील गटाची जगात सर्वाधिक मानाची समजली जाणारी रान्देव्हूज रोलँ गॅरो नॅशनल सीरिज स्पर्धा जिंकली आणि भारतीय टेनिस सम्राज्ञी सानिया मिर्झाची आपणच वारसदार असल्याचे संकेत दिले.






पुण्यातील पीवायसी जिमखाना टेनिस कोर्टवर अठरा वर्षांखालील गटात ही स्पर्धा झाली व बिगरमानांकित मल्लिकाने अव्वल मानांकित श्राव्या शिवानीचा ६-४, ६-३ असा धुव्वा उडवत गुणवत्तेला वयाचे बंधन नसते हे सिद्ध करीत विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत म ल्लिकाने पात्रता फेरीतील सामने जिंकत मुख्य फेरीत प्रवेश मिळवला होता, हे तिच्या विजेतेपदाचे मोठे वैशिष्ट्य आहे.

## रान्देवूज स्पर्धेचे महत्त्व

मल्लिका मराठेसह पुरुष एकेरीत सिद्धांत बांठिया याने देखील विजेतेपद मिळवले आणि ही स्पर्धा जिंकली. विम्बल्डन ज्युनिअर व ज्युनिअर स्तरावरच्या ज्या काही प्रतिष्ठित स्पर्धा समजल्या जातात त्यापैकी रान्देव्हूज रोलँ गॅरो सीरिज स्पर्धा आहे. केवळ तेरा वर्षांच्या मल्लिकाने बिगरमानांकित असतानाही विजेतेपद पटकावले. इतकेच नव्हे तर स्पर्धेतील अंतिम सामन्यात तिच्यापेक्षा वयाने मोठया व अनुभवी श्राव्या शिवानीच्या सरळ दोन सेटमध्ये पराभव केला हेच मल्लिकाची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहे.

## नेत्रज्ज्ञांचे अमूल्य योगदान

'ॲम्ब्लीओपिया' हा डोळ्यांशी निगडीत विकार मल्लिकाला वयाच्या चौथ्या वर्षी झाल्याचे निष्पन्न झाले. यामध्ये दृष्टिदोष निर्माण होतो व मेंदूचा डोळ्यांशी असणारा संपर्क कमकुवत होतो व त्यामुळे प्रसंगी दृष्टी कायमची जाऊ शकते, असे या विकाराचे ढोबळ स्वरूप आहे. हा विकार हजार जणांमागे चार ते पाच व्यक्तींना होतो. नेत्रतज्ज्ञ डॉ. संगीता वाघ यांनी मल्लिकाला या विकारातून मुक्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. कालांतराने हा विकार बरा झाला आणि तिला कारकिर्दीची दूरदृष्टी मिळाली. या विकारावर मात करत असताना कौतुक तिच्या आई-वडिलांचे वाटते की हे सगळे सोपस्कार झाल्यावरही तिच्यावर शिक्षणाबरोबरच टेनिसमध्ये कारकीर्द घडवण्यासाठी त्यांनी पाठिंबा दिला. वयाच्या सातव्या वर्षी राष्ट्रीय खेळाडू संदीप कीर्तने यांच्याकडे टेनिसचे धडे गिरवायला मल्लिकाने सुरूवात केली आणि आज पीवायसीचे यशस्वी प्रशिक्षक हेमंत बेंद्रे यांच्याकडे ती प्रशिक्षण घेत आहे. या सर्व वाटचालीत मल्लिकाच्या आई-वडिलांनी दिलेला पाठिंबा हाच तिच्यासाठी महत्त्वाचा ठरत आहे. घरातून आपल्या आवडीला समर्थन मिळाले तर खेळाडूच काय कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होता येते हे आपण अनेक उदाहरणांनी पाहतो आता येत्या काळात मल्लिका 'ग्रँडस्लॅम' गाजवताना दिसावी ही अपेक्षा आहे.

## संघटनेची 'व्हिजन प्लेअर'

मल्लिका आणि सिद्धांत बांठिया यांनी या स्पर्धेत मुले व मुली या गटात विजेतेपद पटकावले. या दोघांना महाराष्ट्र लॉन टेनिस संघटनेने 'व्हिजन प्लेअर' म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून अशाच सरस कामगिरीची अपेक्षा होती. जेव्हा एखादी संघटना त्यांना आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा देते जेणेकरून खेळाडूच्या कामगिरीला संपूर्ण सहकार्य मिळावे. 'आयटीएफ एशिया डिव्हिजन वन' या स्पर्धेत बारा वर्षांखालील गटात जेव्हा मल्लिका राष्ट्रीय विजेती बनली तेव्हाच खरेतर संघटनेने तिला 'व्हिजन प्लेअर' बनवले. आता वयाच्या केवळ तेराव्या वर्षी ती अठरा वर्षांखालील गटातील खेळाडूंना आव्हान देत आहे. सानिया मिर्झाचा पुणेरी अवतार येत्या काही वर्षात मल्लिकाच्या रूपाने देशवासीयांना पाहायला मिळेल.

## संघटनेचे तत्पर व संपूर्ण सहकार्य

महाराष्ट्र लॉन टेनिस संघटना मल्लिकाला किती आणि कसे

सहकार्य करते याबाबत मल्लिकाच्या आई वैजयंती मराठे भरभरून बोलतात. संदीप कीर्तने यांच्याकडे तिने कारकीर्द सुरू केली आता ती पीवायसी क्लबच्या हेमंत बेंद्रे यांच्याकडे सराव करते. संघटनेचे वैद्य सर, सुंदर अय्यर आणि बेंद्रे यांच्याकडून आवश्यक ते सर्व सहकार्य मल्लिकाला मिळते आणि त्यांच्यामुळेच आज ती हे यश पाहते आहे, असे वैजयंती मराठे म्हणतात. अर्थात हे अजिबात खोटे नाही कारण नुकत्याच पार पडलेल्या डेव्हिस करंडक स्पर्धेचे आयोजन ज्या आदर्श पद्धतीने संघटनेने सुंदर अय्यर यांच्या मार्गदर्शनाखाली केले ते पाहता संघटना आपल्या खेळाडूंबाबत किती गंभीर आहे याची प्रचिती येते. मी डेव्हिस करंडकावर लिहिताना ‘टेनिस संस्कृती सजवणारी स्पर्धा’ असा लेख लिहिला होता, त्याची साक्ष मल्लिका व सिद्धांत यांनी ही स्पर्धा जिंकून दिली. एकूणच देशात क्रिकेट पाठोपाठ टेनिसला अच्छे दिन येत आहेत, याचेच हे द्योतक आहे. भारतीय टेनिसमध्ये महेश भूपती आणि कंपनीने सुरू केलेले ‘राजकारण’ सोडले तर खऱ्या गुणवत्तेला ‘गॉडफादर’ची गरज नसते हेच मल्लिका व सिद्धांतने दाखवून दिले आहे.



**सिद्धांत बांठिया**

### सिद्धांतची गरूड भरारी

मल्लिकाप्रमाणेच पुण्याचा अव्वल मानांकित खेळाडू सिद्धांत बांठिया यानेही स्पर्धा गाजवली. अंतिम लढतीत त्याने दुसरा मानांकित ऋषभ शारदावर ६-२, ६-१ अशी मात केली आणि विजेतेपद पटकावले. सिद्धांतने आजपर्यंत कारकिर्दीत एकेरीची ५२ आणि दुहेरीची ३४ विजेतेपदे मिळवली आहेत. वयाच्या आठव्या वर्षी टेनिसला प्रारंभ करणारा सिद्धांत गाणीही चांगली गातो, शिवाय क्रिकेट खेळण्यातही तो प्रवीण आहे मात्र रान्देव्हूज रोलँ गॅरो स्पर्धा जिंकणे हा त्याचा आजपर्यंतच्या कारकिर्दीचा कळसाध्याय ठरला आहे.

## हेल्पलाइन

# अटकेसंबंधी महिलांचे अधिकार

- महिलांना फक्त महिला पोलिस सूर्योदयानंतर आणि सूर्यास्तापूर्वी अटक करू शकतात.
- कुटुंबाच्या सदस्यांच्या उपस्थितीत व योग्य कारण असेल तरच स्त्रीला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी बोलावता येते.
- स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्येच ठेवता येते.
- महिलांच्या तक्रारीचे स्वरूप असेल तर पोलिस एफआयआर दाखल करतात.
- एफआयआर दाखल केला, तर त्याची प्रत देणे पोलिसांवर बंधनकारक आहे.
- सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी कुठल्याही महिलेला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी थांबवून ठेवता येत नाही.




- पोलिस ठाण्यात महिलेची चौकशी सुरू असेल, तर तिथे महिला कॉन्स्टेबल असणे अनिवार्य आहे.
- महिला आरोपीची वैद्यकीय तपासणी महिला डॉक्टर करील किंवा महिला डॉक्टरच्या उपस्थितीत पुरुष डॉक्टर करू शकेल.
- कुठल्याही महिला साक्षीदाराला पोलिस ठाण्यात येण्याची सक्ती करता येणार नाही. गरज भासल्यास पोलिस तिच्या घरी जातील.

# आयोगाची घटना, अधिकार व कर्तव्ये

भारताच्या राज्य घटनेचे कलम १४,१५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता, विशेषतः राज्य घटनेच्या कलम ३८,३९, ३९-ब, ४२-ब मध्ये अंतर्भूत केलेली राज्याच्या धोरणाची निर्देशक तत्त्वे अमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा सुचविण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे वा उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली करण्यात आली.

## आयोगाची प्रमुख उद्दिष्ट्ये

- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे
- महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचविणे
- राज्य घटना व अन्य कायदे या नुसार महिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे
- त्या संरक्षण उपाययोजनांच्या अंमलबजावणीसंबंधीचे अहवाल दरसाल किंवा आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळी राज्य शासनास सादर करणे
- स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी राज्याला त्या संरक्षक उपाययोजनांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी, यासाठी अशा अहवालांमध्ये शिफारशी करणे
- संविधान व इतर कायदे यांच्या, स्त्रियांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा वेळोवळी आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारात्मक वैधानिक उपाययोजनांबाबतच्या सुधारणांची शिफारस करणे
- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला योग्य सल्ला देणे

## आयोगाचे अधिकार

- महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही वैधानिक संस्था आहे
- आयोगाला खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील
- राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी फर्मावणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे
- कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे
- शपथपत्रावरील साक्षी, पुरावे स्वीकारणे
- कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे
- साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी राजादेश काढणे
- महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखादा राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचाही अधिकार आयोगाला आहे.

## आयोगाचे उपक्रम

- महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरविणे
- महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे
- महिलांविषयक बाबींवर कार्यशाळा, शिबिर आणि प्रशिक्षण आयोजित करणे
- समाजात लिंगसमानता प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे
- सर्व संबंधित घटकांसाठी जनजागृती मोहीम राबविणे
- कायदेविषयक साक्षरता मोहीम राबविणे
- स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपक्रम राबविणे
- राज्यातील कारागृहांची तपासणी करणे
- बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे
- महिलांसाठी विविध शिबिरे आयोजित करणे
- समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे
- आयोगासमोर सुनावणी घेणे
- जनसुनावणी घेणे
- सरकारला महिलांविषयक धोरणांसाठी शिफारशी करणे



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com